रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३१८
www.ramprahar.com

गुरुवार, ५ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

रायगडमध्ये पाच बालविवाह थांबविण्यात यश/२
बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पनवेल मनपातर्फे बैठक/३
३९२ गावे दरडप्रवण, ७१ गावे अतिधोकादायक/५

## भारतात १ मार्च २०२७पासून होणार जनगणना



**नवी दिल्ली :** भारतात १ मार्च २०२७ पासून जनगणना सुरू होईल, पण जम्मू काश्मीर, लडाख आणि उत्तराखंडमध्ये अनेक दुर्गम परिसर असल्यामुळे या राज्यांमधील जनगणना १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्याचे नियोजन सुरू आहे, अशी माहिती केंद्र सरकारने बुधवार ६ जून २०२५ रोजी रोजी दिली. मोदी सरकारने केलेल्या घोषणेनुसार यंदाच्या जनगणनेत जातीची माहितीदेखील नोंदवली जाणार आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वातले सरकार दिलेल्या आश्वासनांना पाळणारे सरकार आहे. गतिमान कारभार, कारभारातील पारदर्शकता याला हे सरकार प्राधान्य देते. हीच बाब जनगणना कार्यक्रम राबविण्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित होणार असल्याचे केंद्र सरकारने सांगितले. अनेक तज्ज्ञांनी जनगणनेद्वारे जातीचा डेटा संकलित करण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# बंगळुरू रॅलीतील चेंगराचेंगरीत ११ बळी

## आरसीबी संघाच्या विजयोत्सवाला गालबोट; 30 जखमी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ च्या हंगामाचे जेतेपद रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघाने पटकावले. गेल्या १८ वर्षांपासून हा संघ विजयाचे स्वप्न पाहात होता. शेवटी हे स्वप्न पूर्ण झाले. दरम्यान, या विजयानंतर भारतभरात विजयोत्सव साजरा करण्यात आला, मात्र बंगळुरू शहरात झालेल्या विजयोत्सवाला गालबोट लागले. येथील मिरवणूकीत चेंगराचेंगरी होऊन सुमारे ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती सांगण्यात आली. तर ३० जण जखमी झाले.





मिळालेल्या माहितीनुसार बंगळुरू संघाच्या विजयानंतर बंगळुरू शहरातील एम. चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर या संघाचे चाहते मोठ्या संख्येने जमले होते. कर्नाटक क्रिकेट असोशिएशनतर्फे बंगळुरू संघाच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभाला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचे सर्वच खेळाडू यात सहभागी होणार होते. यामध्ये भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहली हादेखील येणार होता. या सर्वांचाच या कार्यक्रमात सत्कार होणार होता. ही बाब समजल्यानंतर स्टेडियमच्या बाहरे बंगळुरू संघाच्या चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. ही गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांनी काही ठिकाणी सौम्य लाठीचार्ज केला. त्यानंतर गर्दी अनियंत्रित झाली आणि यात सुमारे ११ जणांचा मृत्यू झाला.

> **बंगळुरूमधील दुर्घटना अत्यंत हृदयद्रावक आहे. या दुःखद घटनेत ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे, त्यांच्याबरोबर माझ्या सहवेदना आहेत. घटनेत जखमी झालेले लवकर बरे व्हावेत, अशी मी प्रार्थना करतो.**
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

दरम्यान, आरसीबीच्या विजयोत्सवादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेवर प्रतिक्रिया देताना भाजपने कर्नाटक सरकारवर टीका केली. भाजपचे नेते बीवाय विजयेंद्र म्हणाले की, या दुर्घटनेची संपूर्ण जबाबदारी कर्नाटक सरकारने घेतली पाहिजे. जेव्हा संपूर्ण देश कर्नाटक आरसीबीच्या विजयाचा आनंद साजरा करत आहे, तेव्हा कर्नाटक सरकारने कोणतीही पूर्व तयारी न करता विजय रॅली काढण्याची घाई केली. त्यामुळे ही दुर्घटना घडली, असा आरोप बीवाय विजयेंद्र यांनी केला आहे.

**'या घटनेची न्यायालयीन चौकशी व्हावी'**

तसेच कर्नाटक सरकारने पूर्वतयारी केली नाही, कारण त्यांना फक्त प्रसिद्धीमध्ये रस होता. याचा परिणाम या घटनेत काही लोकांचा मृत्यू झाला. तसेच काही लोकांवर उपचार सुरु आहेत. मी आता काही पीडितांशी बोललो आहे, त्यांनी सांगितलं की रुग्णवाहिकेची सुविधा नव्हती. या घटनेची न्यायालयीन चौकशी व्हावी, अशी मागणी भाजपाचे नेते बीवाय विजयेंद्र यांनी केली आहे.

## आपत्ती व्यवस्थापनात दर्जेदार काम करा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

आपत्तीमध्ये जीवित व वित्तहानी सोबतच पायाभूत सोयी-सुविधांचे होणारे नुकसान कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. आपत्तीमध्ये सामान्य नागरिकांचे जीवन सुसह्य व्हावे, त्यांना आपत्तीची झळ बसू नये यासाठी आपत्ती व्यवस्थापनात दर्जेदार काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. त्याचबरोबर आपत्ती व्यवस्थापनाचा निधी सौम्यीकरण कामासाठी खर्च व्हावा. तसेच पावसानंतर नुकसान झालेले रस्ते, बंधारे, वीज वाहिन्या दुरुस्ती कामासाठीसुद्धा या निधीचा उपयोग करावा, अशा सूचनाही त्यांनी या वेळी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृहात राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते.

> **नद्यांची वहन क्षमता वाढवण्यासाठी नदी स्वच्छ करून नदीतील गाळ काढणे, राडारोडा काढणे आवश्यक आहे. या कामास जलसंपदा विभागाने प्राधान्य द्यावे.**
> **-अजित पवार, उपमुख्यमंत्री**

राज्य आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले, पूर रेषा केवळ खूण म्हणून न ओळखता पूर रेषेच्या आत अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपत्ती व्यवस्थापनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा. कोकण आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत घेण्यात येत असलेल्या भूमिगत वीज वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळामधले आसरे बांधणे, दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची आणि वीज अटकावची कामे गतीने करावीत.

आपत्तीसंदर्भात सर्वंकष अभ्यास करून ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापनाचे कीट उपलब्ध करून द्यावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## शिवराज्याभिषेक सोहळा : अवजड वाहनांना बंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

श्री शिवराज्याभिषेक सोहळा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून ५ जून रोजी सायं.४ ते ६ जून २०२५ रोजी रात्री १० वाजेपर्यंतच्या कालावधीमध्ये मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाकणफाटा नागोठणे ते कशेडीपर्यंत तसेच माणगांव-निजामपुर मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, माणगांव ढालघरफाटा मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, महाड नातेखिंड मार्गे पाचाड ते रायगड किल्ला या मार्गावरील होणारी सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतुक बंदी अधिसूचना जारी केली आहे.


श्री शिवराज्याभिषेक सोहळा-२०२५ हा कार्यक्रम ५ व ६ जून रोजी किल्ले रायगड येथे साजरा होणार आह. या कार्यक्रमासाठी रायगड, पुणे, सातारा, कोल्हापुर, मुंबई वैगेरे ठिकाणाहून लाखोंच्या संख्येने श्री शिवभक्त हे आपआपली वाहने घेवून येत असतात. तसेच या कार्यक्रमाकरीता आयोजकांच्या सामानाची वाहनेदेखील मोठ्या प्रमाणात श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याकरीता येत असतात. **(पान २ वर..)**

## २१ जुलै ते १२ ऑगस्टदरम्यान संसदेचे पावसाळी अधिवेशन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवार २१ जुलै ते मंगळवार १२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत होणार आहे. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ही माहिती दिली. अधिवेशनाच्या काळात संसदेच्या दोन्ही सभागृहात देशातील विविध विषयांवर चर्चा होणार आहे. अधिवेशनातील कामकाजाची सुरुवात सोमवार २१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज समितीने पावसाळी अधिवेशनाच्या तारखा निश्चित केल्या आहेत. जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी



२६ नागरिकांची हत्या केली होती. पर्यटकांना ठार करण्यात आले होते.

या घटनेनंतर काही दिवसांनी भारताने ऑपरेशन सिंदूर केले आणि पाकिस्तानला दणका दिला होता. ऑपरेशन सिंदूर नंतर भारताने निवडक देशांमध्ये राजकीय शिष्टमंडळे पाठवून देशाची दहशतवाद विरोधी भूमिका जाहीररित्या मांडली होती. शिष्टमंडळांमध्ये सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांतील अनेक नेते सहभागी करुन घेतले होते. या सर्वच शिष्टमंडळांनी भारताची बाजू प्रभावीरित्या जगापुढे मांडली आहे. या पार्श्वभूमीवर संसदेचे पावसाळी अधिवेशन होत आहे.

## निवडक

### मुंबईच्या विमानतळावर ५२ कोटींचे कोकेन जप्त

**मुंबई :** एअर इंटेलिजन्स युनिटच्या अधिकाऱ्यांनी मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एकाला अटक केली. अटक केलेल्या व्यक्तीकडून एअर इंटेलिजन्स युनिटच्या अधिकाऱ्यांनी ५२ कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले. नैरोबीच्या एका हँडलरने ड्रग्जची तस्करी करण्यासाठी १५०० अमेरिकन डॉलर दिल्याची कबुली अटक केलेल्या व्यक्तीने दिली.

### युक्रेनचा क्रिमिया पुलावर ११०० किलो स्फोटकांचा हल्ला

**मॉस्को :** रशिया-युक्रेन संघर्ष पुन्हा एकदा धगधगू लागला आहे. अवघ्या ७२ तासांत युक्रेनने रशियावर दुसरा मोठा हल्ला करत क्रिमिया पूल पुन्हा उद्ध्वस्त केला आहे. रशिया आणि क्रिमियाला जोडणाऱ्या या महत्त्वाच्या पूलाखाली पाण्यात ११०० किलो स्फोटके लावून हा भयंकर हल्ला करण्यात आला. या पुलावर २०२२ पासून आजवर तिसऱ्यांदा हल्ला झाला आहे. यापूर्वी १ जूनला युक्रेनने ड्रोनद्वारे रशियाचे पाच लष्करी तळ उडवले होते आणि ४१ लढाऊ विमाने नष्ट केल्याचा दावा केला होता.

## चिनाब रेल्वे पुलाचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्या उद्‌घाटन



**श्रीनगर : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी (दि.६) जम्मू-काश्मीरची राजधानी श्रीनगरला रेल्वेने जोडण्याकरिता बांधण्यात आलेला जगातील सर्वात उंच रेल्वे पूल, चिनाब पुलाचे उद्‌घाटन करणार आहेत. तसेच श्रीनगर ते जम्मूमधील कटरा यांना जोडणाऱ्या दोन खास डिझाइन केलेल्या वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील, अशी घोषणा केंद्रीय अंतराळ मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी केली. हा पूल जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्पाचा एक भाग आहे.

केंद्रीय अंतराळ मंत्री डॉ. सिंग यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही बातमी शेअर केली आणि म्हटले की, जगातील सर्वात उंच रेल्वे पूल, शक्तिशाली चिनाब पूल, जम्मू आणि काश्मीरमध्ये उंच उभा आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक (USBRL)चा एक भाग. निसर्गाच्या कठीण परीक्षांना तोंड देण्यासाठी बांधलेला. पंतप्रधान मोदी ६ जून २०२५ रोजी चेनाब पुलाचे उद्‌घाटन करणार आहेत. नवीन भारताच्या ताकदीचे आणि दृष्टिकोनाचे अभिमानास्पद प्रतीक!

**दोन नवीन वंदे भारत एक्सप्रेस**

मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी ६ जून रोजी रियासी जिल्ह्यातील चिनाब पुलावर पाहणीसाठी जाण्यापूर्वी उधमपूर येथे उतरण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर ते श्री माता वैष्णोदेवी कटरा स्थानकावर पोहचतील आणि दोन वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवतील - एक कटरा ते बारामुल्ला आणि दुसरी बारामुल्ला ते कटरा अशी व्हर्च्युअल पद्धतीने. या कार्यक्रमाला रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह, जम्मू आणि काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



## घणसोली डेपोत चार एनएमएमटी बस जळाल्या

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

घणसोली डेपोत बुधवारी (दि.४) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास लागलेल्या आगीत एनएमएमटीच्या चार बस जळून खाक झाल्या. मेंटेनन्ससाठी उभ्या असलेल्या डिझेल बसला अचानक आग लागली. या वेळी या बसला लागून उभ्या केलेल्या तीन बस अशा चार बस जळून खाक झाल्या. यात तीन डिझेल तर एक इलेक्ट्रिक बसचा समावेश आहे.

या घटनेची माहिती कळताच नवी मुंबई महापालिका परिवहन महाव्यवस्थापक योगेश कडूसकर यांनी घणसोली डेपोला भेट देऊन पाहणी केली. आग नेमकी कशा मुळे लागली आहे. याबाबत चौकशी केली जाणार आहे. अभियांत्रिकी विभागाकडून बसची तपासणी केली जाणार आहे, अशी माहिती महाव्यवस्थापक कडूसकर यांनी दिली.

घणसोली डेपोत डिझेल बस मेंटेनन्ससाठी २८ मे पासून उभी होती. या बसला अचानक आग लागली. यामुळे एकूण चार बसगाड्यांचे नुकसान झाले.

## वन क्षेत्रालगतच्या गावांमध्ये एआय आधारित कॅमेरे बसवावेत -मंत्री नाईक



**मुंबई : प्रतिनिधी**

वन्यजीव व मनुष्य यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यापासून ग्रामस्थांना वाचविण्यासाठही राज्यातील ज्या ज्या भागात वन्य प्राण्यांचा वावर आहे, अशा वनालगतच्या बफर झोनमधील गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर असणारे कॅमेरे लावण्यात यावेत. यासाठी राज्य शासनाच्या मार्वल या संस्थेची मदत घेण्यात यावी. येत्या पंधरा दिवसात ही कार्यवाही युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी बुधवारी (दि.४) येथे दिले.

विदर्भात विविध ठिकाणी होणाऱ्या मानव व वन्य जीव संघर्ष व वन्य प्राण्यांच्या हल्ल्यासंदर्भात बुधवारी मंत्रालयात बैठक झाली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जायस्वाल, आमदार परिणय फुके, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल) शोमिता बिश्वास, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास राव यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

ना. नाईक म्हणाले की, मानव व वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये, अशा घटनांमध्ये मानवांचा मृत्यू होऊ नये, यासाठी ठोस पावले उचलावीत. वनालगतच्या गावांमध्ये फेन्सिंग करणे, चर खोदणे याबरोबरच वन्य प्राणांची माहिती गावकऱ्यांना कळावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करावा. यासाठी मार्वल या संस्थेची मदत घ्यावी. यासंदर्भातील प्रस्ताव तातडीने मंजूर करून घ्यावा. यासाठी लागेल तेवढा निधी देण्यात येईल.

वनांमध्ये तृणभक्षक प्राण्यांसाठी गवत व वनस्पतींची मोठ्या प्रमाणात लागवड करावी. तसेच वाघांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना शासकीय नोकरी देण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी या वेळी दिले. वनांच्या परिसरातील यापूर्वीच मंजूर रस्त्यांची दुरुस्ती परवानगीसाठी अडवणूक करू नये, अशा सूचनाही त्यांनी या वेळी केल्या.

## लोकनेते गोपीनाथ मुंडेंच्या पुण्यतिथीनिमित्त उपक्रम

### कळंबोलीत रक्तदात्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचा मंगळवार ३ जून रोजी अकरावा स्मृतिदिन भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. स्वामी समर्थ मंदिर सेक्टर ४ येथे जय भगवान युवा प्रतिष्ठान यांच्यावतीने सकाळी ११ ते ४ या वेळेत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

कामोठ्यामधील स्वस्तिक ब्लड बँक यांनी यामध्ये सहभाग घेऊन अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरास पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचा उत्साह वाढवला. या वेळी उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश



नेतकर, कळंबोलीचे माजी शहराध्यक्ष रवीनाथ पाटील माजी नगरसेवक बबन मुकादम सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष अशोक मोटे, भाजप नेते सित्तु शर्मा, भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे व अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

रक्तदान शिबिरानंतर अध्यात्मिक महिला मंडळाचा गीता पठणाचा कार्यक्रम झाला. रात्री सात ते नऊ ह.भ.प. आदिनाथ महाराज लाड शास्त्री आळंदी देवाची यांचे सुंदर व सुश्राव्य किर्तन झाले. या कीर्तनामध्ये महाराजांनी मुंडे साहेबांच्या आठवणी आणि त्यांचा प्रवास श्रोत्यांसमोर मांडला.

या कार्यक्रमास कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील कळंबोली शहराध्यक्ष अमर पाटील माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, देविदास खेडकर आदींनी हजेरी लावली. कार्यक्रमानंतर आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय भगवान युवा प्रतिष्ठानचे सर्व युवा कार्यकर्ते तसेच कृष्णा गर्जे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली व कार्यक्रम यशस्वी केला.

## राज्यातील शाळांमध्ये लष्करी प्रशिक्षण देणार

**मुंबई : प्रतिनिधी**



**शिक्षणमंत्री दादा भुसे यांची घोषणा**

एकंदरीत देशसेवा आणि सैन्य दलाची आवड लहानपणापासूनच व्हावी या हेतुने आता शालेय विद्यार्थ्यांना लष्करी प्रशिक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शाळेत महिन्यातून एक दिवस विद्यार्थ्यांना लष्करी प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक उपक्रम राबवणार आहेत. यंदा १६ जून रोजी शाळा सुरू होतं आहे, विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी मुख्यमंत्री, मंत्री, आमदार आणि अधिकारी वर्गही उपस्थित असणार आहे. त्यातून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्याचं काम केलं जाणार आहे.

विद्यार्थ्यांचा गणवेश शाळांपर्यंत पोहचला आहे, गणवेशाच्या संदर्भाने सूचना करण्यात आल्या असून त्यात २५ ते ३० टक्के कपड्यात कॉटन असायला हवे तसेच शाळेत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाईल, विद्यार्थ्यांचे हेल्थकार्ड केलं जाईल, विविध उपक्रमाचं कॅलेंडर तयार करण्यात आल्याची माहिती शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली.

शालेय विद्यार्थ्यांना आता सैनिकी शिक्षण दिलं जाणार आहे, माजी सैनिकी अधिकारी यांच्यासह शिक्षकांची बैठक झाली आहे. शाळेत विद्यार्थ्यांना महिन्यातून एक दिवस सैनिकी शिक्षण दिलं जाईल, त्यानंतर टप्प्याटप्प्याने ते वाढवले जातील. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांपासून हे बेसिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. दरम्यान, त्याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान मोदींनी आवाहन केल्यानुसार 'एक पेड माँ के नाम' हा संकल्प राबवण्यात येणार आहे. नुसतं वृक्ष लावण्यापर्यंत मर्यादित न राहता ते वृक्ष जगण्यासाठीही प्रयत्न केले जाईल. तसेच, विद्यार्थ्यांच्या सहली शेतकऱ्यांच्या बांधावर जातील, गड किल्ल्यांवर जातील, असेही दादा भुसे यांनी सांगितले. तर, आई-वडिलांनीही पाल्याशी गप्पा मारायला हव्यात, असेही ते म्हणाले.

# लोकोपयोगी कायदे करण्यात महाराष्ट्र देशात अग्रेसर -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, : प्रतिनिधी**

महाराष्ट्र हे देशात सर्व क्षेत्रात अग्रगण्य राज्य आहे. लोकोपयोगी कायदे निर्मितीमध्येही राज्य देशात अग्रेसर असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढत राज्याच्या कायद्याचे अनुकरण देशातील इतर राज्यच नाही, तर अन्य देशही करत असल्याचे सांगितले.

विधि व न्याय विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात विधि विधान शाखेचे बोधचिन्ह अनावरण आणि पाच पुस्तकांचे प्रकाशन सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, विधी व न्याय विभागाचे राज्यमंत्री ड.



आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव सुवर्णा केवले, प्रधान सचिव व विधी सल्लागार श्री शुक्ला, विधी विधान शाखेचे सचिव सतीश वाघोले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये विधी व न्याय विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. कायदा निर्मितीमध्ये विधि व न्याय विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान असते. राज्याचे अनेक कायदे देशाने स्वीकारले आहेत. कायदा निर्मिती होत असताना विधिमंडळात कायद्यांवर तीन – तीन दिवस चर्चा झालेली आहे. चर्चे तून कायदा अस्तित्वात येत असतो. या विभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून निश्चितच या विभागात 'ट्रान्सफॉर्मेशन' ची सुरुवात या वर्षापासून करावी.

सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन लोकोपयोगी कायदे निर्मिती करावी लागते. या संपूर्ण प्रक्रियेत कायदा 'ड्राफ्टिंग' अत्यंत महत्त्वाचे असते. लोकांच्या हिताच्या दृष्टीने कायदा कसा असावा, असा प्रयत्न नेहमी शासनाचा असतो. विधि व न्याय विभागाने निर्मित केलेली पुस्तके पुढील पिढीसाठी ठेवा आहे. हे संदर्भ साहित्य म्हणून निश्चितच कायदा निर्मितीमध्ये उपयोगात येणार आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# रायगडमध्ये पाच बालविवाह थांबविण्यात यश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड कार्यालयातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सूहिता ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण कक्ष, रायगड व चाइल्ड हेल्प लाईन यांच्या माध्यमातून तालुक्यातील पनवेल– ०१ , पेण –०२, माणगाव –०२ असे एकूण ०५ बाल विवाह बाबत कार्यवाही करण्यात आली.

प्रत्यक्ष गावात भेट दिली असता अल्पवयीन बालक व बालिका यांचा बाल विवाह होत असल्याचे समजल्याने दोन्ही बालकांचे आई– वडील व नातेवाईकांना समज देण्यात आली व मार्गदर्शन केले.

हे बाल विवाह होत असल्याची माहिती चाईल्ड लाईनच्या माध्यमातून मिळाली पनवेल येथील रहिवासी असलेली मुलीचे वय १६ वर्ष असे होते. पेण तालुक्यातील मुलीचे वय १७ वर्ष इतके आहे व दुसऱ्या मुलीचे ही वय १७ वर्ष होते. हे बळवली आदिवासी वाडी पेण येथील रहिवासी आहेत. भादाव आदिवासी वाडी माणगाव तालुक्यातील मुलीचा विवाह निश्चित असलेला मुलीचे वय १६ वर्ष आहे. एंकदरीत पाचही वधू अल्पवयीन आहे.

यावरून बाल विवाह होत आहे असे निदर्शनास आले बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अल्पवयीन बालकांचे बाल विवाह होणार नाही या बाबत सूचना देण्यात आल्या.

तसेच पालकांकडून जबाब नामा लिहून घेऊन पालकाला समज देण्यात आली तसेच अल्पवयीन बालकांना बाल कल्याण समिती समोर उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यात आल्या. गाव बाल संरक्षण समिती सदस्य यांना व आई वडील यांना मार्गदर्शन केले व समज देण्यात आली. यावेळी माणगाव पोलिस स्टेशन, पेण पोलिस स्टेशन, जिल्हा बाल संरक्षण कक्ष रायगड चाईल्ड हेल्प लाईन इ उपस्थितीत होते.

या ठिकाणी उपस्थितीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड कार्यालयातील अधिकारी कर्मचारी बाल विवाह थांबविण्यास यशस्वी झाले.

---

## नैना प्रकल्पातील नगररचना लवाद सुनावणीस ३० जून पर्यंत मुदतवाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रभाव क्षेत्रात विशेष नियोजनप्राधिकरण म्हणून सिडकोची शासनामार्फत १० जानेवारी २०१३ रोजी नियुक्तीकरण्यात आली आहे. या नियोजन प्रक्रियेचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे नैनाक्षेत्रातील नगररचना परियोजनांची अंमलबजावणी.

सदर नैना क्षेत्रात सद्यस्थितीत एकूण १२ नगररचना परियोजनाराबविण्यात येत असून, यातील परियोजना क्र. ८, ९, १०, ११ आणि १२ यायोजनांसाठी लवादांची सुनावणी अंतिम टप्प्यात आहे. काही जमीनधारकविविध कारणांमुळे याआधीच्या सुनावणीत सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांनासंधी मिळावी म्हणून सिडकोने यापूर्वी ३० मे २०२५ पर्यंत मुदतवाढ दिलीहोती.

लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार व हितधारकांचा व्यापक सहभागसुनिश्चित करण्यासाठी सिडको आता ही सुनावणी अंतिमतः ३० जून २०२५पर्यंत वाढवत आहे. ही अंतिम मुदत आहे. म्हणूनच सिडको सर्व संबंधितभूधारक, नागरिक आणि हितधारकांना आवाहन करत आहे की, त्यांनी यासंधीचा लाभ घेत आपले म्हणणे मांडण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, जेणेकरून या महत्वपूर्ण प्रकल्पात त्यांचा सक्रिय सहभाग होऊशकेल.

सुनावणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत सिडको नैना कार्यालय,टॉवर क्रमांक१०, ७ वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे संपर्क साधावा.

# भाजप मंडलच्यावतीने पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती



### *हे निबंध स्पर्धा विजेते*

***खुला गट–प्रथम क्रमांक अनघा ताम्हणकर,***
***द्वितीय क्रमांक अनया खांडेकर,***
***तृतीय क्रमांक तन्मय देशमुख***
***लहान गट–प्रथम क्रमांक कु.आर्या कदम,***
***द्वितीय क्रमांक कु. तनिष्का देशमुख,***
***तृतीय क्रमांक कु.सलोनी चौधरी***

**खोपोली, खालापुर : प्रतिनिधी**

पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने देश भरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रदेश जिल्हा आणि शहर मंडल स्तरावर देखील या जयंतीचे कार्यक्रम पार पडले.

मंदिर व घाट स्वच्छ अभियान, शंख नाद महा आरती अशा कार्यक्रमांचे आयोजन काही काही दिवसापूर्वीच भाजप खोपोली शहर मंडलाच्या वतीने करण्यात आले होते.

पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भारतीय जनता पार्टी खोपोली शहराच्या वतीने त्यांच्या जीवन व राजकार्य या विषयांवर ऑनलाईन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होती. या स्पर्धेचा निकाल व बक्षीस समारंभ सोमवार दिनांक २ जून रोजी भाजप मध्यवर्ती कार्यालय खोपोली येथे संपन्न झाला.

भाजप उत्तर रायगड महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा अश्विनीताई पाटील यांनी या प्रसंगी अहिल्यादेव होळकर यांच्या राज्य कारभाराची माहिती देत त्या काळात महिलांचे सक्षमीकरण होण्या करत राबवलेल्या योजनांची माहिती सांगितली. दुष्काळ होऊनये म्हणून शेतकऱ्यांसाठी व लोकांसाठी पाणी योजना, देशातले महावाची मंदिरे व घाटांची पुनर्बांधणी असे महत्वाचे विषयांवर माहिती सांगितली.

भाजप खोपोली शहर अध्यक्ष राहुल जाधव यांनी आमदार प्रशांत ठाकुर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वा खाली त्रिशताब्दी जयंती निमित्त राबवलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली. या कार्यक्रमांच्या माध्यमातून अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती आताच्या व येणाऱ्या पिढीला मिळण्यासाठी भाजपने अनेक कार्यक्रम व उपक्रम राबविले आहेत. सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र, रोक रक्कम भेट वस्तू बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमासाठी या स्पर्धा कार्यक्रम प्रमुख अश्विनी अत्रे, भाजप शहर मंडलाचे विकास नाईक, अपर्णा साठे, सुप्रिया नांदे, सीमा मोगरे, सुमीता महर्षी, विमल गुप्ते, विभावरी पाठक, रेखा शिंदे, धनश्री अत्रे, राजेश्री शेजवळ, महेश खेडेकर, किर्ती ओसवाल, गणेश ठाकरे, प्रमोद वाघ, ऋषिकेश म्हात्रे व भाजपचे पदाधिकार व कार्यकर्ते उपस्थित होते. परीक्षक म्हणून अविनाश मोरे, वैशाली पवार, ऋषिकेश गोसावी, रेश्मा देशमुख यांनी काम पाहिले.

# म.रा. प्राथमिक शिक्षक समितीची मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा



**रोहे : प्रतिनिधी**

३ जून रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती रायगड यांच्या पदाधिकारी यांनी राजिप अलिबाग मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले (भा.प्र.से.), राजिप अलिबाग शिक्षणाधिकारी (प्राथ) पुनिता गुरव यांची भेट घेवुन शिक्षकांच्या विविध मागण्याविषयी चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हाध्यक्ष विजय येलवे, रोहा तालुकाध्यक्ष ब्रिजेश भादेकर, रोहा तालुका सरचिटणीस संजय बागडे, रोहा तालुका कार्यालयीन चिटणीस संतोष धोत्रे आदि शिक्षक उपस्थित होते.

भेटी दरम्यान चर्चा करण्यात आलेल्या विविध विषयांमध्ये १ नोव्हेंबर पूर्वीची जाहिरात असलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन संदर्भात खाते क्रमांक राहिलेल्या शिक्षकांचे त्रुटी दूर करून संचालक साहेब पुणे येथे शिफारस करावी व पीएफ कपात साठीची टॅब चालू करण्यासंदर्भात पत्रव्यवहार करावा, राहिलेले शिक्षकांचे स्थायित्व प्रमाणपत्र लवकर मिळणे संदर्भात चर्चा करण्यात आली, शिक्षकांची प्रलंबित मेडीकल बिल, भविष्य निर्वाह निधी नापरतावा प्रस्ताव संदर्भात चर्चा करण्यात आली, ऑनलाईन शिक्षक बदलीपूर्वी केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करणेबाबत चर्चा केली.

---

# बेलापुरमधील पाणी तुंबण्याच्या समस्येवर आमदार म्हात्रे आक्रमक

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे व भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी सीबीडी येथील व्यापारी तसेच महापालिका शहर अभियंता व इतर संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बेलापूर येथील होल्डिंग पाँडचा पाहणी दौरा केला. नवी मुंबईमधील बेलापूर विभागातील सेक्टर १२ येथे असलेले सिडको निर्मित पावसाळी जलउदंचन केंद्र (पंप हाऊस) हे गेले ३५ ते ४० वर्षे जुने असून त्याचे भूमिपूजन होऊन देखील वर्षे झाले होते परंतु अद्याप पर्यंत काम पूर्ण न झाल्याने अवकाळी पावसामुळे नवी मुंबईत व विषेशत: सीबीडी बेलापूर विभागात सखल भागात पाणी साचले. सेक्टर ४,५,११ येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने



जनजीवन विस्कळीत झाले.यांबाबत बेलापुर येथील होल्डिंग पाँड कामाची पाहणी केली. जर कंत्राटदाराने वेळेत काम पूर्ण केले नाही तर तर संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे अशी आक्रमक भूमिका आ. मंदा म्हात्रे यांनी घेतली.

यंदाच्या पावसाळ्यात बेलापुर विभाग पाण्याखाली गेला होता. सेक्टर ४, ५ मध्ये पाणी साचून व्यापाऱ्यांच्या दुकानात, नागरिकांच्या घरात पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अद्याप मुख्य पावसाळा सुरू झालेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये व व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच अनुषंगाने बुधवारी बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सीबीडी येथील व्यापारी तसेच महापालिका शहर अभियंता शिरीष आरदवाड व इतर संबधित अधिकाऱ्यांसमवेत बेलापूर येथील होल्डींग पाँडचा पाहणी दौरा केला.

### ते अतिक्रमण काढून टाका

सीबीडी येथील भरतीच्या पाण्याला रोखण्यासाठी बनवलेल्या होल्डींग पाँडच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण देखील झाले आहे. सदरच्या अतिक्रमणावर येत्या ४ दिवसात कारवाई करण्याचे निर्दे श बेलापूर विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना आमदार मंदा म्हात्रे यांनी दिले.

# नेरळ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ग्रामीण आरोग्यसेवेचा आदर्श ठरेल -महेंद्र थोरवे

**कर्जत ; प्रतिनिधी**

'नेरळ मल्टीस्पेशिअलिट हॉस्पिटल सुरू होत आहे ही कर्जत तालुक्यातील आरोग्य क्षेत्रातील क्रांती आहे. मुंबईसारख्या शहरात मिळणाऱ्या सर्व सुविधा आता आपल्याच तालुक्यात मिळणार आहेत. हे हॉस्पिटल केवळ वैद्यकीयदृष्ट्या नाही तर सामाजिकदृष्ट्याही अत्यंत मोलाचं योगदान देणार आहे. हे रुग्णालय ग्रामीण आरोग्यसेवेचा आदर्श व्यवस्थापनाने गरजूंना शक्य ती मदत करावी.' असे आवाहनही आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.



कर्जत तालुक्यातील नागरिकांना आरोग्याचे काळजी घेणाऱ्या नेरळ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटर चे उद्घाटन आज आमदार महेंद्र थोरवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. विवेक भगत, डॉ. हेमंत इंगोले, डॉ. दीपक सिंग आदी उपस्थित होते.

### हॉस्पिटलची वैशिष्ट्ये

*या हॉस्पिटलमध्ये आयसीयू, एनआयसियू, व्हेंटिलेटर, डायलिसिस युनिट, पॅथॉलॉजी लॅब अशा आधुनिक यंत्रणांसह तज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम कार्यरत आहे. रुग्णांची तातडीने काळजी घेता यावी यासाठी सर्व सुविधा एका छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.*

कर्जत तालुका हा आदिवासी बहुल, डोंगरी व ग्रामीण भाग असल्यानं इथं आरोग्याच्या अत्याधुनिक सुविधांचा अभाव होता.

---

**पान १ वरुन**

## शिवराज्याभिषेक सोहळा : अवजड वाहनांना बंदी

या सोहळ्याकरीता येणारे शिवभक्त हे रायगड किल्ला येथे माणगांव–निजामपुर मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, माणगांव ढालघरफाटा मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, महाड नातेखिंड मार्गे पाचाड ते रायगड किल्ला असे जाण्याचे एकूण तीन मार्ग आहेत. या मार्गावरून शिवभक्त हे आपआपल्या वाहनाने मोठ्या संख्येने येत असतात. तसेच शासकीय यंत्रणा यांच्या वाहनांची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात असते. सदर शिवभक्तांची वाहने ही मुंबई–गोवा महामार्गावरून कशेडी घाट ते महाड, तसेच वाकणफाटा–नागोठणे–कोलाड–माणगांव–महाड या महामार्गावरून येत असतात. त्यातच मुंबई–गोवा महामार्गावरून मोठ्या प्रमाणात जड–अवजड वाहनांची देखील प्रचंड प्रमाणात वाहतूक होत असते अशावेळी अपघात, वाहतूक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या कार्यकमाच्या वेळी कोठे ही वाहतुक कोंडी निर्माण होवू नये व श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याकरीता येणारे शिवभक्त यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी जिल्हाधिकारी जावळे वाहतूक बंदी जाहीर केली आह.

ही वाहतूक पंपी अधिसूचना ही दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला इत्यादी जिवनावश्यक वस्तु चाहून नेणारी वाहने, मोवीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने, रुग्णवाहीका या वाहनांना लागू राहणार नाही. या अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जावळे यांनी दिले आहेत.

## एकल प्लास्टिक वापराविरुद्ध अभियान

**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने ५ जून रोजी सकाळी मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी हे त्यांच्या वापरातील एकल प्लास्टिक टाकून देणार असून प्लास्टिक वापरणार नाही अशी शपथ घेणार आहेत. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जातो. या वर्षाची पर्यावरण दिवसाची संकल्पना 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करणे' अशी आहे. ही संकल्पना केंद्र शासनाने स्विकारलेल्या मिशन लाईफशी संलग्न आहे. मिशन लाईफमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्विकार करण्यात आला आहे. त्यामध्ये एकल वापराच्या प्लास्टिकला नकार देणे प्लास्टिकचा कचरा रोखणे याचा समावेश आहे.

# माणगावात अनोखा वाढदिवस व गुणगौरव सोहळा उत्साहात!

**माणगाव: प्रतिनिधी**

एक जून म्हणजे तसा असंख्य नागरिकांचा वाढदिवस पण याच दिवशी माणगाव नगरपंचायतमधील वॉर्ड क्र.६ मध्ये आनंदनगर याठिकाणी एक कौटुंबिक सोहळा संपन्न झाला.

वॉर्ड क्र.६ मधील दहावी आणि बारावी परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि गुलाबपुष्प देऊन प्रोत्साहित करण्यात आले.त्यानंतर वाढदिवसानिमित्त वॉर्डातील जेष्ठ श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांना ,५ कुमारीकांनी औक्षण करून शुभेच्छा देण्यात आल्या. उपनगराध्यक्षा हर्षदा काळे आणि इतर भगिनींनी सर्वांचे औक्षण केले. त्यानंतर उत्साहाच्या वातावरणात वाढदिवसाचे केक कापण्यात आले. माणगाव नगरीच्या इतिहासात असा अनोखा उपक्रम पहिल्यांदाच



अनुभवला. सर्व वाढदिवस साजरा केलेल्या नागरिकांनी समाधान व्यक्त केले

दहावी व बारावी परीक्षेते यश मिळाल्याबद्दल थोरा मोठ्याकडून सत्कार व आशीर्वाद मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह पाहायला मिळाला असा अनोखा कार्यक्रम आयोजित करून सत्कार व वाढदिवस केल्याबद्दल उपनगराध्यक्षा हर्षदा काळे व युवानेते सुमित काळे यांना आशिर्वाद दिले असेच कार्यक्रम घेऊन वॉर्डातील,एरियातील नागरिक एकत्र येतात व त्यामुळे एकोपा तयार होत असतो.अडी अडचणी कळत असतात त्यामुळेच या संकल्पनेला चालना देत राहण्याची अभिवचन उपनगराध्यक्षा हर्षदा काळे यांनी दिले

या कार्यक्रम प्रसंगी वॉर्ड क्र. ६ चे अध्यक्ष प्रकाश जाधव, चारिझेन फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा,किशोर झेमसे ,उद्योजक राजेश विचारे, डॉ शहा ,शिव व्याख्याते रामजी कदम,दत्ताराम शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते

## निवडक

### २५ हजारांची फसवणूक

**पनवेल :** अर्ध्या किमतीत लॅपटॉप विकत देतो सांगून एकाची २५ हजारांची फसवणूक करण्यात आली आहे. तळोजा येथील मानकसिंग राजपुरोहित यांच्यासोबत हा प्रकार घडला. त्यांनी सीबीडी येथे ओळख झालेल्या वसीम शेख याला ही रक्कम दिली होती. शेख याने तो विजय सेल्समध्ये मॅनेजर असल्याचे सांगून ५० हजारांचा लॅपटॉप २५ हजारांत मिळवून देतो, असे सांगून पैसे घेऊन त्यांची फसवणूक केली. याप्रकरणी सीबीडी पोलीस ठाण्यात वसीम शेखविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दागिने खेचून दोघेजण पसार

**पनवेल :** एका ज्येष्ठ नागरिक महिलेच्या गळ्यातील दागिने



खेचून दोघे जण पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. सुषमा पाटील (वय ६५) या मिडलक्लास हौसिंग सोसायटी परिसरात फिरत असताना त्यांच्या गळ्यात असलेली सोन्याची चेन व सोन्याचे मणी वाटी असलेले मंगळसूत्र असा जवळपास ७५ हजार रुपये सोन्याचा ऐवज मोटरसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी खेचून पोबारा केला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कारची धडक, चालक जखमी

**पनवेल :** चुकीच्या दिशेने आलेल्या कारने दुसऱ्या कारला धडक दिल्याने झालेल्या अपघातात जैनल मतीऊर अब्दिन (रा. सेक्टर, २४ उलवे) हे जखमी झाले. या अपघातप्रकरणी कारच्या (एमएस ४६–एएक्स ३३५५) चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जैनल हे पहाटे कार (एमएच ०१–डब्ल्यू ५३०४) घेऊन पनवेल ते उलवे जात होते. पहाटे चारच्या सुमारास जेएनपीटी हायवे सीएनजी पंपाच्या विरुद्ध बाजूस हायवेने जात असताना समोरून आलेल्या कारने त्यांच्या कारला धडक दिली. या अपघातात कारचा पुढील भाग डॅमेज झाला असून, जैनल जखमी झाले. तसेच कारमधील प्रवाशांना किरकोळ मार लागला आहे.

# गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ

## नेवाळी येथे घरफोडी; लाखोंच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

नेवाळी येथील घरात अज्ञात चोरट्याने पाठीमागील दरवाजाची कडी तोडून प्रवेश केला आणि घरातील साडेअकरा तोळे वजनाच्या सोन्याच्या दागिन्यांची घरफोडी केली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रमोद दशरथ खांडेकर हे नेवाळी, पनवेल येथे राहत असून त्यांच्या घरातील सर्वजण गावातील नातेवाईकांच्या उटण्याच्या कार्यक्रमासाठी गेले होते. त्यांनी दरवाजाला कुलूप लावला होता.



कार्यक्रम संपल्यानंतर त्यांचे वडील घरी आले असता त्यांनी मुख्य दरवाजा उघडला असता दरवाजा आतून बंद असल्याचे जाणवले. त्यामुळे ते पाठीमागील दरवाजाकडे गेले असता पाठीमागचा दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले.

या वेळी प्रमोद खांदेकर व त्यांची पत्नी मुलासह ते घरी पोहचले. त्यांनी आतमध्ये जाऊन पाहिले असता लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडा दिसला आणि बेडवर सोन्याचे दागिने ठेवण्यासाठीचे बॉक्स पडलेले होते. चोराने त्यांच्या घरात प्रवेश करून आठ तोळे वजनाची सोन्याची गंठण, सोन्याचा चोकर, चैन, अंगठी, टोंगल, रिंग, कुडी असे एकण साडेअकरा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

## तरुणाला चौघांनी लुटले

**पनवेल : वार्ताहर**

कारने घरी जात असलेल्या तरुणाला चार अज्ञात लुटारूने रस्त्यात अडवून त्याला लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून त्याच्याजवळ असलेली सोन्याची चेन व इतर ऐवज लुटून पलायन केल्याची घटना उलवेमध्ये घडली.

विनय जितेंदर कुमार (वय २९) असे लुटण्यात आलेल्या तरुणाचे नाव असून तो उलवे सेक्टर–२१ मध्ये राहतो. विनय हा पहाटे सव्वादोन वाजण्याच्या सुमारास त्याच्या कारने उलवे येथील घरी जात होता. या वेळी अज्ञात चौकडीने उलवे सेक्टर–२१ येथे त्याची कार अडवून त्याला कारमधून बाहेर खेचले व त्याला लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांनी विनय कुमार याच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचली तसेच त्याचा मोबाईल व पॉकेट काढून घेतले, त्याच्या कारच्या काचा फोडून तेथून पलायन केले.

जखमी विनय कुमार अपोलो हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले. पोलिसांनी या घटनेची माहिती मिळताच त्यांनी रुग्णालयात जाऊन विनयचा जबाब नोंदवून घेतला आहे. त्यानंतर त्याला मारहाण करून लुटणाऱ्या अज्ञात चौकडीविरोधात गुन्हा नोंद केला आहे.

## ट्रेडिंगमध्ये गमावले ४१ लाख

**पनवेल : वार्ताहर**

फेसबुकवरून मैत्री वाढवून सायबर गुन्हेगारांनी महिलेच्या नावे एकाची ४१ लाख ८२ हजारांची फसवणूक केली आहे. आपण ट्रेडर असल्याचे सांगून या महिलेने त्यांना एका लिंकवर पैसे गुंतविण्यास सांगितले होते. तिच्यावर विश्वास ठेवून ऑनलाईन पैसे पाठविल्यानंतर या व्यक्तीला फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

पनवेल परिसरातील ३५ वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे. गतवर्षी त्यांना एका महिलेने फेसबुकवर फ्रेंड्स रिक्वेस्ट पाठवली होती. या सायबर गुन्हेगारांनी महिलेच्या नावे गंडविले, पोलिस पनवेल शहर ठाण्यात गुन्हा दाखल, पोलिसांकडून तपास सुरू व्यक्तीने तिच्या मैत्रीचा स्वीकार करताच तिच्या मागणीवरून या व्यक्तीने त्याचा मोबाईल नंबर तिला दिला होता. त्यानुसार दोघांमध्ये अनेक दिवस चॅटिंगद्वारे गप्पा सुरू होत्या.

यादरम्यान आपण ट्रेडर असून, एका कंपनीसाठी काम करत असल्याचे या महिलेने सांगितले. तर या व्यक्तीलादेखील ट्रेडिंगमधून पैसे कमावण्याची इच्छा होती. त्यामुळे महिलेच्या सांगण्यावरून त्यांनी टप्प्याटप्प्याने एकूण ४१ लाख ८२ हजार रुपये ऑनलाईन गुंतवले होते, मात्र त्याचा मोबदला त्यांना मिळाला नाही. शिवाय मैत्रिणीनेही संपर्क तोडला. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली.

## लग्नाच्या आमिषाने तरुणीवर अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

लग्नाचे आमिष दाखवून तीन वर्षांपूर्वी पळवून नेलेल्या तरुणीशी लग्न न करता तिच्यासोबत लिव्ह इन, रिलेशनशीपमध्ये राहिलेल्या तरुणाने तिला सोडून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. तळोजा पोलिसांनी या प्रकरणातील पीडित तरुणीच्या तक्रारीवरून आरोपी तरुणाविरोधात अपहरणासह बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेतील २३ वर्षीय पीडित तरुणी तळोजा येथे राहण्यास असून तिच्यासोबत राहणारा २८ वर्षीय किरण हा तरुण बीड जिह्यातील आहे.

चार वर्षांपूर्वी किरण तळोजा भागात राहण्यासाठी आला असताना, पीडित तरुणी व किरण या दोघांमध्ये प्रेमसंबध निर्माण झाले होते. त्यावेळी आरोपी किरणने पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिला तळोजा गावातून पळवून नेले होते. त्यानंतर हे दोघेही लग्न न करता लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. त्यांना दोन वर्षांपूर्वी एक मुलगीही झाली. त्यानंतर हे दोघेही तळोजामध्ये राहत असताना किरणने काही दिवसांपूर्वी पीडित तरुणीला व दोन वर्षीय मुलीला इथेच सोडून आपल्या मूळ गावी पलायन केले.

या प्रकारानंतर पीडित तरुणीने किरणच्या बीड येथील मूळ गावी धाव घेतली, मात्र त्याच्या कुटुंबियांनी तिला स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर त्यांच्यामध्ये भांडण झाले. पीडित तरुणीला या वेळी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर बीड पोलिसांनी पीडित तरुणीचा जबाब नोंदवून घेत तिचा स्वीकार न करणाऱ्या आरोपी किरणविरोधात अपहरण आणि बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

## अभीष्टचिंतन



**पनवेल : भाजप ज्येष्ठ नेते राम गोजे आणि युवा नेते सुदेश फडके यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनिश ढवळे, अशोक साळुंखे, हेमंत माने, के.सी. पाटील आदी उपस्थित होते.**



# पनवेल महापालिकेतर्फे बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवरती नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बकरी ईद सणानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच सण शांततेत संपन्न होण्याकरिता नियोजन करण्याच्या हेतूने मंगळवारी (दि.३) महापालिकेच्या मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली पालिका मुख्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकिस पोलीस उपायुक्त अशोक राजपुत, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड, पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, तळोजाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत, वरिष्ठ पोलीस



निरीक्षक खारघर दीपक सुर्वे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक खांदेश्वर स्मिता ढाकणे, चारही प्रभागाचे प्रभारी अधिक्षक, चारही प्रभागातील मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

७ जून रोजी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बकरी ईद सण साजरा करण्यात येणार आहे. या सणानिमित्त मुस्लीम बांधवाकडून कुर्बानी देण्याची प्रथा आहे. कुर्बानी देणेकामी तात्पुरते कत्तलखाने उभारणेकरिता परवानगी घेणे आवश्यक असते. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बकरी ईद करीता कुर्बानी साठी काही अटी व शर्तीस अधिन राहुन तात्पुरता कत्तलखाना उभारण्यास परवानगी देण्यात येते. यासाठी प्रभाग समिती निहाय, प्रभाग अधिकारी यांना सदर परवानगी देणेकामी प्राधिकृत करण्यात आले आहे. संबंधितांनी परवानगीसाठी अर्ज करण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले.

चारही प्रभागांमध्ये ज्या ठिकाणांना परवानगी देण्यात आली आहे. त्याठिकाणीच बकऱ्यांची कत्तल केली जावी, ही ठिकाणे बंधिस्त असावीत, विविध सूचना या बैठकित देण्यातआल्या. तसेच महापालिकेकडून पाण्याची सोय व स्वच्छता विभागाने वाहनांची सोय करण्याबाबत मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी मागणी केली.

आयुक्तांनी या मागण्या मान्य करून हा सण शांततेत, उत्साहात संपन्न होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन पालिका व पोलिस विभागाच्यावतीने करण्यात आले. तर परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी सर्व उपस्थित त्यांचे आभार मानले.

# पनवेलमध्ये दोन दिवसीय नाट्यमहोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना ७४ वर्ष पूर्ण झाले असून त्यांनी त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय नाट्यमहोत्सव पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात २ आणि ३ जून रोजी आयोजीत करण्यात आला होता.



या महोत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंळगवारी भेट घेऊन आपल्या जिवनतील आठवणींना उजाळा दिला तसेच आयोजकांचे कौतुक केले. या नाट्यमहोत्सवामध्ये २ जून रोजी सायंकाळी ४ आणि रात्री ८ वाजता विनोदी नाटक एका लग्नाची पुढची गोष्ट सादर झाला तर दिनांक ३ जून रोजी सायंकाळी ४ आणि रात्री ८ वाजता विनोदी नाटक कुटुंब किर्रतन रंगले. या मनोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या वेळी शकुंतला रामशेठ ठाकूर, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, भाजप सांस्कृतीक सेलचे अभिषेक पटवर्धन, श्यामनाथ पुंडे, चिन्मय समेळ, गणेश जगताप यांच्यासह नाट्यप्रेमी मोठ्या उपस्थित होते.

# उरण बस डेपो येथे वृक्षारोपण



### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**उरण : वार्ताहर**


माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने उरण भाजप वतीने बस डेपो उरण आगार येथे वृक्षारोपण सोमवारी केले. कार्यक्रमाचे आयोजक भाजप उरण रायगड जिल्हासरचिटणीस चंद्रकांत घरत होते. उरण बस डेपोसाठी अक्कागार्ड छत्र्या, देण्यांत आल्या, असे चंद्रकांत घरत यांनी सांगितले.

या वेळी उरण तालुका भाजप नेते रवी भोईर, माजी नागराध्क्ष सायली म्हात्रे, महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, तालुकासरचिटणीस सुनील पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, सीमा घरत, अनंत घरत, गोपीनाथ म्हात्रे, प्रा. प्रमोद म्हात्रे, भगवान घरत, सुप्रिया म्हात्रे व भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## खारघरमध्ये इमारतीला आग

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील सेक्टर ३५ मधील गीतांजली टॉवरमध्ये



बुधवारी दुपारी भीषण आग लागली. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. इमारतीच्या १३व्या मजल्यावर आग लागल्याचे वृत्त आहे. दुपारी लागलेल्या या आगीमुळे आकाशात काळ्या धुराचे लोट पसरले होते, जे दूरवरून दिसत होते.

या घटनेची धक्कादायक दृश्ये ऑनलाइन समोर आली आहेत, ज्यामध्ये संपूर्ण इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याचे दिसत आहे, ज्यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. सुदैवाने, या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. आगीची माहिती मिळताच, अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि अग्निशमन कार्याचे समन्वय साधण्यासाठी वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले होते. अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे.

## आज पर्यावरण दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे शुक्रवारी (दि.५) जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम व कापडी पिशवी वेंडिंग मशीनचे उद्‌घाटन सकाळी ९:३० वाजता होणार आहे, अशी माहिती पनवेल महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. यानिमित्त वीर वाजेकर कॉलेजचे प्राचार्य डॉ.अमोद ठक्कर, डॉ.गजानन चव्हाण, डॉ.संदीप घोडके, राम गोसावी, एम. सी. सोनावले, राहुल पाटील, अतुल पाटील, सुप्रिया नवले यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# नियोजनशून्यतेचे बळी

गर्दीच्या नियोजनासाठी वेळ मिळालेला नसताना कर्नाटकातील प्रशासनाने 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु' संघाच्या सत्काराचा कार्यक्रम ठेवलाच कशासाठी? विजयानंतर लगेचच सेलिब्रेशन करण्याची घाई ११ जणांच्या जिवावर बेतली असून ही दुर्दैवी घटना सगळ्यांनाच दु:खी करून गेली आहे.

विराट कोहलीच्या 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' या संघाने तब्बल १८ वर्षांनंतर पटकावलेल्या आयपीएल २०२५च्या जेतेपदाच्या बंगळुरूमधील सेलिब्रेशनला बुधवारी दुर्दैवी गालबोट लागले. सत्कारसोहळा सुरू असलेल्या चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर लाखो चाहत्यांची गर्दी जमल्याने चेंगराचेंगरी होऊन ११ जण त्यात मृत्यूमुखी पडले. जवळपास ५० जण या चेंगराचेंगरीत जखमी झाले असून काहींची प्रकृती अत्यवस्थ असल्याने मृतांचा आकडा वाढण्याचीही भीती आहे. चेंगराचेंगरीची दुर्दैवी घटना घडल्यानंतरही सत्काराचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. दहा मिनिटांत आपण हा कार्यक्रम उरकला असे आयोजकांनी म्हटले असले तरी ही असंवेदनशीलता नव्हे काय? विजयी संघातील खेळाडूंची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी गर्दी केली. बंगळुरू शहरभरातून लाखोंच्या संख्येने चाहते जमा झाले. मात्र गर्दीच्या नियंत्रणासाठी कोणतीच व्यवस्था तिथे नव्हती. कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या बेजबाबदारपणामुळेच हे घडले आहे असे कुणी म्हटल्यास त्यात चुकीचे ते काय? चेंगराचेंगरीत अकरा क्रिकेटप्रेमींचा बळी गेलेला असताना कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी पोलिस किंवा प्रशासनाला याबद्दल दोष देता येणार नाही असे उद्गार काढले. याला काय म्हणावे? चाहते संघावरच्या प्रेमापोटी तेथे आले होते. गर्दीचे नियोजन पोलिस व प्रशासनाला करता आले नाही हे दुर्दैवी आहे. कर्नाटक क्रिकेट असोसिएशनतर्फे बंगळुरू संघाच्या या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. विजयाच्या आनंदोत्सवात सहभागी व्हावे, या क्षणाचे साक्षीदार व्हावे असे चाहत्यांना वाटले यात त्यांची चूक काय? सरकारला, प्रशासनाला नेमके किती लोक यावेळी रस्त्यावर उतरतील याचा अंदाज आला नाही. मंगळवारी रात्रीच्या विजयानंतर अवघ्या सतरा-अठरा तासात सेलिब्रेशन आयोजित करताना किती गर्दी होऊ शकेल याचा अंदाज घ्यायला हवा होता. लाखो चाहत्यांची गर्दी झाली की चेंगराचेंगरी होते हे यापूर्वीही अनेकदा दिसले आहे. भारतात क्रिकेटमधील विजयानंतर कुठल्याही शहरात लाखोंची गर्दी उसळत असतेच. भारताने वर्ल्ड टी२०चा चषक जिंकल्यानंतर मुंबईत आयोजित विजयी टीमच्या मिरवणुकीतही प्रचंड गर्दी उसळली होती. परंतु मुंबईतील पोलिसांनी, प्रशासनाने पुरेसा वेळ घेऊन नियोजन केले होते. गर्दीला वानखेडे स्टेडिअमपासून दूर थोपवण्यात आले होते. तरीही मरिन लाइन्सजवळ क्रिकेटप्रेमींची गर्दी उसळून काही लोकांचा श्वास कोंडला, घेरी आली. परंतु चेंगराचेंगरीसारखी दुर्दैवी घटना मात्र टळली. मुंबईत विमानतळापासून वानखेडे स्टेडिअमपर्यंतचा मोठा परिसर मिरवणुकीसाठी ठेवण्यात आला होता. त्यामुळे गर्दीचे विभाजन शक्य झाले. गर्दीचा अंदाज आला नव्हता असे म्हणणे त्यामुळेच खटकणारे आहे. काही हजार पोलिसांना लाखोंची गर्दी नियंत्रित करण्यास वेळ मिळाला नाही असे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही म्हटले आहे. एखादा महत्त्वाचा सामना असेल तरी त्यासाठी किती गर्दी होईल याचा अंदाज पोलिसांकडून घेतला जातो. विजयोत्सवासाठी गर्दीचा अंदाज येत नसला तरी परिसरातील साऱ्यांचे सहकार्य घेऊन गर्दीचे नियोजन करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. बंगळुरूत मात्र चेंगराचेंगरी झाली असतानाही सत्कारसोहळा उरकून घेण्यात आला. गर्दीचे नियंत्रण करता आले नाही याची जबाबदारी त्या राज्यातील प्रशासन व पोलिसांना स्वीकारावीच लागेल.

# महाड तालुक्यात ७२ गावांवर दरडीची टांगती तलवार




**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड तालुक्यात गेली काही वर्षांमध्ये सातत्याने भूस्खलन, जमिनींना भेगा पडणे, दरड कोसळणे, अशा घटना घडत आहेत. यावर्षी देखील पावसाचे प्रमाण अधिक असल्याने दर्डीचा धोका कायम आहे, मात्र तरीदेखील प्रशासन अद्याप सुस्त असल्याचे दिसून येत आहे. तालुक्यामध्ये या वर्षीदेखील ७२ गावांचा समावेश दरडग्रस्त यादीमध्ये करण्यात आला आहे.

महाड तालुका हा डोंगराळ व दुर्गम भाग असून तालुक्याचा ८० टक्के भाग दऱ्या खोऱ्यात वसलेला आहे. या सर्व भागामध्ये १९९५ सालापासून सातत्याने दरडी कोसळत आहेत. २००५ मध्ये महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणात दरडी कोसळून शेकडो लोकांना जीव गमवावा लागला होता. त्यानंतर तळीये गावातदेखील अशाच प्रकारे दरड कोसळली आणि जीवितहानी झाली होती. यामुळे महाडसह पोलादपूर तालुक्यातील अनेक गावे संभाव्य दरडग्रस्त गावांच्या यादीत आले आहेत. याबाबत प्रतिवर्षी कागदोपत्री नियोजन केले जात आहे. प्रत्यक्षात या संभाव्य दरडग्रस्त गावांमध्ये अद्याप उपायोजना करण्यात आलेल्या नाहीत.

मागील वर्षी महाड मध्ये दरडप्रवण क्षेत्रामधून भूस्खलन होण्याच्या शक्यतेने नागरिकांना स्थलांतरित करावे लागणार आहे. मात्र अद्याप या गावांमधून तात्पुरत्या निवासस्थानांचीदेखील उभारणी झालेली नाही. शासनाकडे संभाव्य दरडग्रस्त भागात भूस्खलन होईल किंवा तो भाग पावसाच्या पाण्यामुळे खचेल अशी पूर्व संदेश देणारी किंवा संकेत देणारी यंत्रणा विकसित नाही. महाड तालुक्यात संभाव्य दरडग्रस्त गावांच्या यादीत लोअर तुडील, नामावले कोंड, शिंगरकोंड मोरेवाडी, आंबिवली पातेरीवाडी, कोंडीवते मूळ गावठाण, सव, सोनघर, जुई बुद्रुक, चांढवे खुर्द, रोहन, वलंग, कोथेरी जंगमवाडी, माझेरी, पारमाची वाडी, कुंबळे, कोसबी, वामने, चिंभावे बौद्धवाडी, वराठी बौद्धवाडी, चोचिंदे, चोचिंदे कोंड, गोठे बुद्रुक, आदिस्ते, खैरे तर्फे तुडील, कुर्ला दंड वाडी, रावतळी मानेचीधार, मोहोत सुतारवाडी, मांडले, पिंपळकोंड, मुमुर्शी आंब्याचा कोंड, मुमुर्शी गावठाण, मुमुर्शी बौद्धवाडी, वीर गाव, वीर मराठवाडी, टोळ बुद्रुक, दासगाव भोईवाडा, तळोशी, बिरवाडी वेरखोले, करंजखोल, नडगाव काळभैरव नगर, पुनाडेवाडी, पाचाडवाडी, सांदोशी हेटकर कोंड, शेलटोळी, अंबेशिवथर, वाळण बुद्रुक, नाणे माची, कोंडीवते नवीन, हिरकणी वाडी, पाचाड परडी वाडी, वाघेरी आदिवासी वाडी, कोथेरी तांदळेकर वाडी, करंजाडी म्हस्के कोंड, नातोंडी धारेची वाडी, गोंडाळे, खर्डी, पांगारी मनवेधार, वरंध पोकळे वाडी, वरंध बौद्धवाडी, आड्राई, वाळण झोळीचा कोंड, वाळण केतकीचा कोंड, भीवघर, पिंपळवाडी, रुपवली, निगडे, बारसगाव, कोथेरी, ओवळे, खरवली, तळीये असून या ७२ गावांतील हजारो नागरिकांना निवारा शेडमध्ये तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करावे लागणार आहे.



यावर्षी १५ मे पासूनच पावसा सुरवात झाली आहे. त्यातच किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या तयारीत प्रशासन गुंतले आहे. यामुळे मान्सूनपूर्व कामे आणि संभाव्य दरडग्रस्त गावांमध्ये अद्याप कोणत्याच उपाययोजना झालेल्या नाहीत. या गावातील ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित होण्याबाबत नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. शासकीय पातळीवर नागरिकांना स्थलांतर करणे, स्थलांतर करण्यासाठी निवारा व्यवस्था, महाड शहरात पूरपरीस्थिती लागणारी बचाव यंत्रणा, संपर्क साधनांची उपाययोजना, बोटींची व्यवस्था पूरपरिस्थितीत दूरध्वनी यंत्रणा अशा सुविधा अद्याप कागदावरच आहेत. महाड तालुक्यातील महसूल यंत्रणा व आपत्ती निवारण यंत्रणा पावसाळा तोंडावर आला असताना शासकीय अधिकारीदेखील सुस्त झोपी गेले आहेत.

धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास शाळा, समाजमंदिर, मंदिर, अंगणवाडी अशाठिकाणी या नागरिकांची ठेवण्याची व्यवस्था करण्यात येईल असे महाडचे तहसीलदार महेश शितोळे यांनी सांगितले. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास किंवा संपूर्ण पावसाळ्यामध्ये तलाठी मंडळ अधिकारी आणि इतर महसूल कर्मचाऱ्यांनी यांना दिलेल्या ठिकाणीच वास्तव्य करायचे आहे, मात्र तक्रार आल्यास कारवाई केली जाईल, असेही तहसीलदार महेश शितोळे यांनी सांगितले.

## बदलते तंत्रज्ञान

# एक्सने नवे मॅसेंजिंग फीचर केले लाँच




अनेक लिमिटेशनमुळे माघारलेल्या ट्विटरला आपल्या मालकीचे करत पोस्टचे टेक्स्ट वाढविण्यापासून ते चिमनी काढून त्याजागी एक्स टाकण्यापर्यंत एलन मस्कनी खूप बदल केले आहेत. आता त्यांनी फेसबुक, व्हॉट्सअपला टक्कर देण्यासाठी नवे मॅसेंजिंग फीचर XChat लाँच केले आहे.


एक्स चॅटनमध्ये तुम्हाला एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, ऑटो डिलीट मेसेजेस आणि कोणत्याही प्रकारच्या फाइल्स पाठवण्याचे पर्याय मिळणार आहेत. सध्या हे बीटा व्हर्जन असून काही रिजनमध्ये ते देण्यात येत आहे. एक्स चॅट सध्या चाचणीच्या टप्प्यात आहे व ते काही युजरना वापरता येणार आहे. अद्याप ते सर्वसामान्यांसाठी कधी रिलीज केले जाईल याबद्दल कोणतीही माहिती दिलेली नाही.

अब्जाधीश एलन मस्क यांनी रविवारी यासंबंधी पोस्ट करत माहिती दिली आहे. मस्क यांच्या दाव्यानुसार एक्स चॅटमध्ये बिटकॉइन-शैलीतील एन्क्रिप्शन कोडिंग वापरण्यात आले आहे. एक्सचॅटवरून युजर ऑडिओ आणि व्हिडिओ कॉलदेखील करू शकणार आहेत. महत्वाचे म्हणजे यासाठी मोबाईल नंबर लिंक करण्याची गरज ठेवलेली नाही.

व्हॉट्सॲपमध्ये उपलब्ध असलेली सर्व वैशिष्ट्ये एक्सचॅटमध्ये देण्यात आली आहेत. पाठवणारा आणि प्राप्तकर्ता यांच्यामध्ये सुरक्षितपणे डेटा पोहोचविण्यासाठी एंड टू एंड एन्क्रिप्शन सुरक्षा प्रणाली यात वापरण्यात आली आहे. म्हणजेच मध्येच कोणीही ती माहिती मिळवू शकणार नाही. जेव्हा तुम्ही एखाद्याला संदेश पाठवता तेव्हा तो संदेश तुमच्या डिव्हाइसवर एन्क्रिप्ट केला जातो. तो पुढे पाठवून एंड युजरकडे तो डिक्रीप्ट केला जातो. यामुळे तो मध्येच डीकोड करणे शक्य होत नाही.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर नेहमीच नवीन फिचर येत असतात. यात लाइव्ह व्हिडिओ स्ट्रीमिंग, एआय आधारित सामग्री निर्माण, आणि डेटा विश्लेषण यांचा समावेश होतो. हे फीचर्स वापरकर्त्यांना अधिक इंटरेक्टिव्ह आणि पर्सनलाइज्ड अनुभव देतात. आता एक्सनेही नवे फिचर आणले आहे, ज्यामुळे युजर्सना अधिक सुविधा मिळतील.

# साहित्यिक गोविंदराव सदाशिव टेंबे



## निमित्त

प्रख्यात महाराष्ट्रीय हार्मोनियमवादक, संगीतरचनाकार, गायकनट व साहित्यिक गोविंदराव सदाशिव टेंबे यांचा जन्म ५ जून १८८१ रोजी सांगवडे (जि. कोल्हापूर) येथे झाला. त्यांच्या आईचे नाव अंबा. गोविंदरावांनी कोल्हापूर येथेच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतले व काही वर्षे सनदी वकिली केली.

गायनाच्या कार्यक्रमात जाऊन त्यांना संवादिनी (हार्मोनियम) या वाद्याची आवड निर्माण झाली. प्रत्यक्ष या वाद्यवादनाचे रीतसर शिक्षण त्यांनी घेतले नव्हते, मात्र स्वप्रयत्नाने त्यांनी या वादनात प्रावीण्य मिळवले. गोविंदराव भास्करबुवा बखले यांच्या साथीला असायचे आणि बहुतेक वेळा संवादिनीचा एकपात्री प्रयोगही करायचे. ते बर्कतुल्ला सितारिये यांचे गंडाबंद शागीर्द होते.

अयोध्येचा राजा या पहिल्या मराठी बोलपटात ते नायकाच्या प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शनही त्यांनी केले होते. यांखेरीज त्यांनी पट-वर्धन (१९२४), तुलसीदास (१९२८), वत्सलाहरण (१९२९), वरवंचना (शेरिडनच्या ड्यूएन्नाचे रूपांतर, १९२५), गंभीर घटना (ऑस्कर वाईल्डच्या इंपॉर्टन्स ऑफ बीइंग अर्नेस्टचे रूपांतर, १९३२), तारकाराणी, देवी कामाक्षी, मत्स्यभेद इ. नाटके लिहिली तसेच महाश्वेता, जयदेव, प्रतिमा इ. संगीतिका (ऑपेरा) लिहून त्या सादरही केल्या. १९३९मध्ये त्यांनी म्हैसूर संस्थानच्या युवराजांबरोबर यूरोपचा दौरा केला. तेथे त्यांना पोपच्या समोर कार्यक्रम करण्याची संधी मिळाली.

संवादिनी या साथीच्या वाद्याला टेंबे यांनी स्वतंत्र वाद्याची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पेटीवर बोटे टाकण्याची त्यांची पद्धत अंत:करणाचा ठाव घेणारी होती. जयपूर घराण्याची तेढी, बिकट गायकी व अभिजात नाट्यसंगीत या दोहोंचे वादन ते सारख्याच कुशलतेने पेटीवर करीत. संगीतातील काही बाळबोध प्रकारांवर आधारलेल्या किर्लोस्करी नाट्यसंगीताला अभिजात हिंदुस्थानी संगीताचा तसेच वेधक कर्नाटकी चालींचा नवीन साज चढविण्यात व संगीताला नाटकात अग्रेसर स्थान प्राप्त करून देण्यात टेंबे यांचा वाटा फार मोठा आहे. या दृष्टीने मानापमान व विद्याहरण या नाटकांतील चाली उल्लेखनीय आहेत. त्यांनी मराठी संगीताचा मानबिंदू अशा लक्षणगीतांची रचना केली.

माझा संगीत-व्यासंग (१९३९), माझा जीवन विहार (आत्मचरित्र, १९४८), खाँसाहेब अल्लादियाखाँ यांचे चरित्र (१९५४), जीवनव्यासंग (१९५६) ही त्यांची महत्त्वाची ग्रंथनिर्मिती. टेंबे यांच्या ग्रंथांतून नाट्य व संगीताची दुनिया अतिशय हृद्यतेने रूपास आली आहे. नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, संगीतक्षेत्रातील पहिले सौंदर्यमीमांसक, संगीतिकांचे पहिले प्रवर्तक वगैरे अनेक क्षेत्रांत ते पहिले म्हणून गाजले. भारत नाट्य संमेलन (१९३३), मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक उत्सव, नागपूर (१९४३), मराठी साहित्य परिषद, बडोदे आदींची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली. कोल्हापूरातील गायन समाज देवल क्लब या संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते या संस्थेचे काही काळ संचालकही होते. या संस्थेमध्ये त्यांच्या स्मरणार्थ' गोविंदराव टेंबे रंगमंदिर' उभारण्यात आलेले आहे.

गोविंदरावांचा विवाह लक्ष्मी यांच्याशी झाला. त्यांना रघुनाथ, गणेश व माधव हे तीन पुत्र. गोविंदरावांचे दिल्ली येथे ९ ऑक्टोबर १९५५ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# हार्ट अटॅक येऊ नये असे वाटत असेल तर या गोष्टी करा

आपण बऱ्याचदा हृदयविकाराचा त्रास हा फक्त वाईट आहार घेणाऱ्या किंवा व्यायाम न करणाऱ्या लोकांनाच होतो असे आपण समजतो, परंतु दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलच्या कार्डिओलॉजी विभागातील सल्लागार डॉ. संजीव कुमार गुप्ता यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.



डॉ. गुप्ता स्पष्ट करतात झोपेची तीव्र कमतरता ही सामान्य गोष्ट नाही. त्यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि अचानक हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. दररोज रात्री चांगली झोप घेणे हे जास्त महत्त्वाचे आहे. यावर तुमच्या हृदयाचे आरोग्य अवलंबून असते.

आपल्याला माहीत आहे की घाणेरडी हवा धुळीमुळे श्वास घेण्यास त्रास देते. पण, ती तुमच्या हृदयालाही इजा करते. वायू प्रदूषणाच्या दररोजच्या संपर्कात, विशेषतः रहदारीमुळे एथेरोस्क्लेरोसिसचा धोका वाढतो, असे डॉ. गुप्ता म्हणतात. जर तुम्ही शहरात किंवा वर्दळीच्या रस्त्यांजवळ राहत असाल, तर प्रदूषणाच्या सर्वाधिक वेळेचे तास टाळण्याचा प्रयत्न करा आणि शक्य असेल तेव्हा घरी एअर फिल्टर वापरा.

विविध प्रकारची चिंता आणि त्यामुळे मनात रेंगाळणारे नकारात्मक विचार यांमुळे येणारा सततचा ताण कॉर्टिसोलची पातळी उच्च ठेवतो, ज्यामुळे दीर्घकालीन दाह आणि उच्च रक्तदाबाचा त्रास होतो. या नकारात्मक विचारासह येणाऱ्या मानसिक ताणाचाही तुमच्या हृदयावर जास्त परिणाम होत असतो. त्यामुळे चालणे, डायरी लिहिणे किंवा कोणाकडे तरी आपले मन मोकळे करून बोलणे आदींद्वारे मानसिक ताण कमी करून, तुम्ही तुमचे हृदय खरोखर दीर्घकाळ सुरक्षित ठेवू शकता.

आश्चर्यकारक पण खरे की दात स्वच्छ न ठेवल्यानं तुमच्या हृदयाला हानी पोहोचू शकते. उपचार न केलेले हिरड्यांचे आजार दाह वाढवतात, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

प्रत्येकाला ताजे अन्न उपलब्ध नसते आणि ही एक मोठी समस्या आहे. निरोगी पर्यायांची कमतरता असते, यामुळे हृदयावर परिणाम होतो. अनेकदा आतड्याच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे होणाऱ्या कोलेस्ट्रॉल, रक्तदाब व जळजळ या त्रासांचा हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीच्या कार्यावरही विपरीत परिणाम होतो. अधिक फायबर, आंबवलेले अन्न खाणे आणि प्रक्रिया केलेले अन्न मर्यादित करणे केवळ पचनासाठी चांगले नाही, ते तुमच्या हृदयालादेखील मदत करते.

# रायगड जिल्ह्यात ३९२ गावे दरडप्रवण, ७१ गावे अतिधोकादायक

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात दरडप्रवण गावांमध्ये वाढ झाली आहे. यापूर्वी करण्यात आलेल्या सर्वेक्षणात १८३ गावे दरडप्रवण होती. आता ही संख्या दुप्पाट झाली आहे. नव्याने करण्यात आलेल्या सर्वेक्षणात ३९२ गावे दरडप्रवण म्हणून जाहीर करण्य्यात आली आहे. पोलादपूर तालुक्यातील सर्वाधिक १४० गावांचा समावेश आहेत. यातील ७१ गावे अतिधोकादायक दरड क्षेत्रात आहेत. येथे पावसाळ्यात दरड कोसळण्याची शक्यात आहे. या गावांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

यापूर्वी रायगड जिल्ह्यात दरड कोसळण्याच्या ११ मोठ्या दुर्घटना घडल्या आहेत. जिल्ह्यात कोंडिवते, जुई, रोहण, कोतवाल, लोयर चव्हाणवाडी, तलीये, सुतारवाडी, केवनाळे, इर्शाळवाडी या ठिकाणी दरड कोसळण्याच्या दुर्घटना घडल्या आहेत. यामध्ये ३५० पेक्षा अधिक नागरिकांचा बळी गेला आहे. खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे दरड कोसळली होती. त्यानंतर जिल्ह्यात पुन्हा भौगोलिक सर्वेक्षण करण्यात आले. यात ३९२ गावे दारादग्रस्त असल्याचे आढळले.

उरण तालुक्यातील एकाही गाव दरडग्रस्त या पूर्वी झालेल्या भौगोलिक सर्वेक्षणात १८३ गावे दरडप्रवण होती. आता दरडप्रवण वगाची संख्या आता ३९२ झाली आहे. अतिधोकादायक २१ गावात 'पीए सिस्टम' म्हणजे सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली बसविण्यात आली आहे. जिल्हा नियंत्रण कक्षातून एकाच वेळी २१ ठिकाणी हवामान विषयक पूर्व सूचना देण्यात येतील. लाइव्ह किंवा रेकॉर्डस संदेश देता येईल. सायरन वाजविला जाणार, संदेश देण्यासाठी ऑपरेट करणे शक्य होणार आहे.

### दरडप्रवण गावांची तालुकानिहाय संख्या

**अलिबाग ९, कर्जत ५, खालापूर १२, तळा ३,पनवेल ३, पेण १३, पोलादपूर १४०, महाड १२१, माणगाव २२, मुरुड ९, म्हसळा १४, रोह २०, श्रीवर्धन १२, सुधागड ९.**

## मिठेखार येथे दुर्गामाता उत्सव उत्साहात साजरा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील मिठेखार येथे दुर्गामाता उत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. पंचक्रोशीत प्रसिध्दीस असलेल्या या दुर्गा माता मंदिराचे उत्सवाचे निमित्ताने भक्तांनी मोठया श्रध्देने दर्शनाचा लाभ घेतला.



मिठेखार येथे उभारलेल्या दुर्गामाता मंदिरात शनिवार दि.३१ मे रोजी प्रतिवर्षा प्रमाणे दुर्गामाता उत्सवाचे ग्रामस्थ मिठेखार यांनी आयोजन केले होते. या निमित्त मंदिरा सभोवती विदयुत रोषनाई, भव्य रांगोळी तसेच दुर्गामात मंदिर सुंदर सजावट करण्यात आली होती. मिठेखार ग्रामस्थांचे वतीने दुर्गामाता मंदिरात पुजाविधी तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या उत्सवाचे निमित्ताने आमदार महेंद्र दळवी यांनी भेट देवून दर्शनाला लाभ घेतला, यावेळी त्यांचे समवेत शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरतशेठ बेलोसे, जेष्ठ नेते सि.एम. ठाकूर, शिवसेना मुरूड उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, तळेखार ग्रा.प.सरपंच विजय घाणेकर, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ, नारायण मुंबईकर, रमेश गायकर, शिवसेना मुरूड तालुका महिला संघटक निर्मला म्हात्रे, महिला उपतालुका प्रमुख वैशाली रोटकर,आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमाचे आयोजन

**रायगड : रामप्रहर वत्त**

वीर मुरारबाजी देशपांडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,महाड येथे दि.०६ जून रोजी सकाळी १०.०० वाजता शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सामाजिक समरसता या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमासाठी माजी प्रशिक्षणार्थी, त्यांचे पालक आणि नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य श्री. एन. एस. पुरकर यांनी केलेआहे.सदर कार्यक्रम सोहळ्याचे उदघाटन मुख्यमंत्री महोदयांचे हस्ते ऑन लाइन पध्दतीने करण्यात येणार आहे.

# खबरदारी घ्या, विद्युत अपघात टाळा

कोणत्याही मूलभूत गरजेइतकीच वीजही आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनली आहे. जीवन सुखकर बनवण्यासाठी ज्याप्रमाणे आपल्याला विजेचा फायदा होऊ शकतो, त्याचप्रमाणे ती वापरताना योग्य काळजी घेतली नाही, तर विद्युत अपघात घडून नुकसान होऊ शकते. सर्वांनी सुरक्षिततेचे नियम पाळले तर हे अपघात टाळता येतात. महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त...

शॉर्टसर्किटपासून होणारे अपघात असोत की, वीज हाताळताना होणारे अपघात, हे खबरदारी न घेतल्यामुळेच होतात. शहरापासून ते ग्रामीण भागापर्यंत विद्युत अपघाताच्या घटना पाहता आता अधिक जागरूकतेने व सुरक्षितपणे विजेचा वापर करणे क्रमप्राप्त झाले आहे. याकरिता प्रभावी जनजागृतीची आवश्यकता आहे.

'वीज' ही अशी बाब आहे, ही डोळ्याने दिसत नाही परंतु ती वापरताना काळजी घेतली नाही तर होणारे परिणाम टाळता येत नाहीत. वीज हाताळताना चुकीला माफी नाही. त्यामुळे वीज उपकरणे हाताळताना काय काळजी घ्यावी, याचा प्रत्येकानेच गांभीर्याने विचार करावा.

घर, उद्योग,कार्यालय अथवा शेती असो, वीज वापरताना प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. वीजपुरवठा घेताना किंवा वेळोवेळी विद्युत केबल, स्विचेस अथवा इतर उपकरणे ही 'आयएसआय' प्रमाणित असल्याचे व योग्य क्षमतेचे असल्याची खात्री करावी. विद्युत सर्किटवर क्षमतेपेक्षा जास्त भार टाकू नये. प्रमाणित ठेकेदारांकडूनच विद्युतीकरणाची कामे करुन घ्यावीत. वायरिंगसाठी योग्य क्षमतेचे एमसीबी (मिनिएचर सर्किट ब्रेकर) वापरावेत, जेणेकरून अतिभार किंवा शॉर्टसर्किटमुळे धोका निर्माण होणार नाही. गुणवत्ता नियंत्रण मंडळाने प्रमाणित केलेली विद्युत उपकरणेच वापरावीत. उदा. मिक्सर, पाण्याचे हीटर, टोस्टर, ग्राईंडर, फ्रीज, वॉशिंग मशीन इत्यादी.

वीज वापरामध्ये अर्थिंग हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. अनेक अपघात हे योग्य प्रकाराची अर्थिंग न केल्यामुळे घडल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे वायरिंग इन्स्टॉलेशनसाठी कॉपर प्लेट किंवा कॉपर रॉडची अर्थिंग कार्यक्षमपणे घेणे सुरक्षेच्या दृष्टीने गरजेचे आहे.

अर्थ लीकेजपासून होणारा धोका टाळण्यासाठी ईएलसीबी (अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर) वापरावे. मोठमोठ्या अपार्टमेंटमध्ये २० ते ५० मीटरची स्वतंत्र मीटर रूम असते. बऱ्याच वेळा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मीटर रूम स्वच्छ, प्रकाशित व हवेशीर असली पाहिजे. पावसाळ्यात मीटर रूममध्ये पाणी जाणार नाही; त्याचबरोबर भिंती ओल्या होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. मीटर रूमचा वापर स्टोअर रूम म्हणून करू नये. मीटर रूममध्ये उंदरांचा वावर होणार नाही, याकडेही लक्ष दिले पाहिजे. तेथे ज्वालाग्राही पदार्थ ठेवणे टाळावे. न्युट्रल वायरसाठी उघड्या वायरचा वापर न करता इन्सुलेटेड वायरचाच वापर करा. एका सर्किटमध्ये मल्टी प्लग/तारा घालू नका. त्यामुळे शॉर्टसर्किट होऊन आगीस निमंत्रण मिळते.

शॉर्टसर्किटमुळे आग लागल्यास प्रथम मेन स्विच बंद करा. विद्युतरोधक अग्निशमनचा वापर करा. पाण्याचा वापर करू नका. प्लग, पिन, बटण, बोर्ड यांना तडे गेल्यास ती त्वरित बदलावीत. पंखे, इस्त्री, कूलर वापरताना त्यात वीजप्रवाह उतरू शकतो. याची जाणीव ठेवूनच सावधानतेने ती हाताळावीत.

विजेविषयी अज्ञान असणे, ही गोष्ट जितकी भयानक आहे, त्याहीपेक्षा ज्ञान असूनही निष्काळजीपणा, फाजील आत्मविश्वास हे अधिक भयंकर आहे. अतिउत्साहात अगदी निष्णात लोकदेखील हातात रबरी ग्लोव्हज घालणे, पायात सेफ्टी बूट वापरणे तसेच वीजपुरवठा बंद करून मग काम करणे, अशा छोट्याछोट्या बाबींकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे जीवितहानी झाल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. रात्रंदिवस विजेच्या क्षेत्रात काम करणारे कामगार, जनमित्र, वायरमन यांनी आपले जीवनमूल्य जाणून घेऊन आपल्यावर आपल्या कुटुंबाचीही जबाबदारी असल्याचे भान ठेवूनच विद्युतीकरणाचे काम करावे. सुरक्षेचे उपाय हे केवळ आपल्यासाठी नसून आपल्याशी निगडित प्रत्येक घटकासाठी तितकेच महत्वाचे आहेत, याची जाणीव सातत्याने ठेवणे महत्वाचे आहे

विद्युत उपकरणे ओल्या हाताने हाताळू नका. वीजवाहिनीच्या खाली किंवा जवळ कोणतेही बांधकाम करू नका. विद्युत खांब किंवा खांबांचा ताण यांना गुरे-ढोरे बांधू नका. विद्युतप्रवाह सोडू नका. तात्पुरते लोंबकळणारे वायर वापरू नका. विजेचा अनधिकृत वापर टाळा. कुलरमध्ये पाणी टाकताना वीजपुरवठा बंद ठेवा. विजेच्या तारेखाली कापलेले पीक ठेवू नका. कपडे वाळवण्यासाठी वीज तारांचा वापर करू नका. विजेच्या तारा तुटून जमिनीवर पडल्या असतील तर त्यांना स्पर्श करू नका किंवा त्या ओलांडून जाण्याचा प्रयत्न करु नका व इतरांनाही तसे करू देऊ नका.

**- विजयसिंह दुघभाते, जनसंपर्क अधिकारी, महावितरण, कल्याण परिमंडल.**

## रोह्यात ६ जूनला शिवसृष्टीचे लोकार्पण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरात नगर परिषदेच्या वतीने साकारण्यात आलेल्या शिवसुष्टीचे लोकार्पण ६ जुन रोजी खासदार सुनील तटकरे, महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सायंकाळी ५ वाजता कुंडलिका नदीसंवर्धन येथे होणार आहे, अशी माहिती मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांनी पत्रकार परीषदेत दिली.

या वेळी माहीती देताना मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांनी कुंडलिका नदीसंवर्धन येथे ३ अक्टोंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्यात आला होता. याच परीसरात तीन कोटी २३ लाख खर्चून शिवसुष्टी तयार करण्यात आले आहे. या शिवसुष्टीचे ६ जुन रोजी लोकार्पण करण्यात येणार आहे.

या शिवसुष्टीमध्ये एफ.आर.पी.मध्ये शिवनेरी, प्रतापगड, रायगड, सिंधुदुर्ग हे किल्ल्यांची प्रतिकृती व शिवराज्याभिषेक भिंतीचित्र साकारण्यात आले.


**पाहिजेत**

**नामांकित प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी मध्ये पनवेल या ठिकाणी एक जागा भरणे आहे.**

| पदनाम | संख्या |
|---|---|
| १) सिक्युरिटी सुपरवायझर | ०१ |

अनुभवास प्राधान्य दिले जाईल/( Ex- Army)

मोबाईल नं. : ७०२०८९६३५३ / ९६६५५३२९५०



### जाहिर नोटीस

**अॅम्युचअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडिया (रजि. क्र. महा-९, एफ-४१४०५)**

सर्वांना कळविण्यात येते की, अॅम्युचअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडिया ही संस्था धर्मादाय आयुक्त, पुणे येथे नोंदणीकृत असून देशभर अधिकृत कार्यरत आहे.

तुषार महादू जाधव हे संस्थेच्या नावाचा गैरवापर करून स्व. संतोष गुरव यांच्या नावाने अनधिकृत संस्थेच्या मंजुरीशिवाय व बेकायदेशीररीत्या ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी स्पर्धा व रेफरी कार्यशाळा दि. ५ ते ७ जून २०२५ या कालावधीत नाशिक येथे आयोजित करीत आहेत. रेफरी कार्यशाळेसाठी २५००/- फी, स्पर्धेसाठी संघ फी ३०००/- व त्याशिवाय प्रत्येक खेळाडूंकडून १४००/- (नोंदणी फी, गेम डेव्हलपमेंट फंड, भोजन वगैरेसाठी) फी आकारण्यात येत आहे, जे अत्यंत गंभीर व गैरप्रकाराचे आहे.

सदर कार्यक्रमांसोबत अॅम्युचअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेचा कोणताही संबंध नाही. कोणत्याही खेळाडूंनी, राज्य संघटनांनी किंवा पालकांनी श्री. जाधव यांना कोणतीही फी, संलग्नता शुल्क किंवा देणगी देऊ नये. त्यांच्यातर्फे वितरित केली जाणारी कोणतीही प्रमाणपत्रे पूर्णतः अवैध व अमान्य असतील.

तुषार जाधव यांनी संस्थेचा कार्यकाळ २०२५ मध्ये संपल्याचे खोटे भासवून दि. ३१ मे २०२५ रोजी अनधिकृत सभा व निवडणूक आयोजित केली. मात्र, संस्थेची नवी कार्यकारिणी १ जानेवारी २०२३ रोजीच विधिवत गठीत झालेली असून, कोणत्याही निवडणुकीचा प्रश्नच उद्भवत नाही. अतः दि.३१ मे २०२५ रोजी ची सभा व निवडणूक फसवी, बनावट व बेकायदेशीर आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**तुषार महादू जाधव हे संस्थेचे अधिकृत पदाधिकारी नाहीत. त्यामुळे त्यांच्यावतीने घेतलेले कोणतेही निर्णय, आर्थिक व्यवहार किंवा स्पर्धा हे अवैध व रद्द ठरतील. त्यामुळे सर्व सदस्य, खेळाडू, पालक, राज्य संघटना व जनतेने अशा अनधिकृत आणि बनावट उपक्रमांपासून सावध राहावे.**

सही/- अध्यक्ष
संदीप प्रल्हाद गुरव
अॅम्युचअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडिया,

सही/- सचिव
प्रिया संतोष गुरव,
अॅम्युचअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडिया,

www.indialagori.com । ई-मेल lagori@indialagori.com,
मो. ९९६०७०२५१०



### पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय :-०२२-२७४५८०४०/४१/४२
ई मेल:- panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

**अंदाजपत्रक बनविणेकामी**

| अनु.क्र | प्रकरण क्र | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | निविदा/पमपा/मातंवि/३०२५/ प्र.क्र.०३/१९९/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका कार्यालयातील संगणकांकरीता Auto cad 3D व Arc GIS १०.८ खरेदी करणेबाबत. |

या बाजारभावाबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. ०५/०६/२०२५ ते दि. १३/०६/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. २४०/२४२/२०२५**
**दिनांक :- ०४/०६/२०२५**

**सही/-**
**उप आयुक्त (मातंवि)**
**पनवेल महानगरपालिका**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेल शेती मिळकत त्या मिळकत समोर लिहीलेल्या मालक/कब्जेदार कडुन आमचे अशिल विकत घेणार आहेत सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड खरेदीखत करणार आहेत, सदर शेती मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ.क्र | मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र- हे. आर.चौ.मी | आकार रूपै |
|---|---|---|---|---|---|
| १ | नयना संजय पारेख, फुलवंती रमेश परमार, नयना सुरज परमार, अभिषेक सुरज परमार, अक्षित सुरज परमार | ४६ | १/२/ ब | ०-१२-९० पो.ख.०-०१-३० एकुण ०-१४-२० | ३.०० |
| २ | | ५४ | ४ | ०-४३-४० पो.ख.०-०२-३० एकुण ०-४५-७० | ९.९४ |
| ३ | | २०३ | १/१/क | ०-२३-४० पो.ख.०-०६-७० एकूण ०-३०-१० | ५.४४ |
| ४ | अभिषेक सुरज परमार, अक्षित सुरज परमार, फुलवंती रमेश परमार, नयना सुरज परमार | ३ | १ | ०-३६-७० पो.ख. ०-०२-७० एकूण ०-३९-४० | ८.१९ |
| ५ | | ४ | ब | ०-३३-६० पो.ख. ०-००-०० एकूण ०-३३-६० | ७.८१ |

वर नमूद केलेल्या शेती मिळकतींमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत त्वरीत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर शेती मिळकत निर्वेध आहे, असे समजू समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक/कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व खरेदीखत रजिस्टर्ड करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण - पनवेल
दिनांक ०४/०६/२०२५

**सही/-**
**अॅड. प्रराग प्रफुल्ल म्हात्रे**
**(अॅडव्होकेट हायकोर्ट व नोटरी)**
**११, केशव वसंत जुने तहसिल कार्यालया समोर, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे-निताळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतीची मिळकत आमचे अशिलांनी सदर शेतीच्या मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालककडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे-निताळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| जमीन मालकांचे नांव | गट क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.प्रति.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्रीम. भागीबाई बुध्या पाटील मयत तर्फेकायदेशीर वारस्त श्री. गजानन बुध्या पाटील, वगैरे श्रीम. स्मिता सुरेश शिंदे | १०० | १ | ०-६३-२० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-६४-७० | ११.६९ |

सदर शेतजमिनीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळवहिवाट ताबेकब्जा, बोजा, एम.ओ.यू., साठेकरार, वचन चिठ्ठी, बयाणापावती, फरोक्त खत, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांचे आंत योग्य त्या सकृत दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर शेतजमिनीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाण - पनवेल
दिनांक-०४/०६/२०२५

**सही/-**
**अॅड. स्वप्नेश संजय घरत**
**ऑफिस क्र. १, पहिला मजला, ए विंग, यशोकिरण को.ऑ.हौ.सो.,सावकर चौक, पनवेल, जि. रायगड -४१०२०६**
**मो. ९६९९०३६४३२/८३६९४९४३४१**



राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १६/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | विळे भागड औद्योगिक क्षेत्र... विळे भागड औद्योगिक क्षेत्रात बी प्रकारच्या अग्निशमन केंद्राचे बांधकाम व तद्अनुषंगिक कामे करणे. | ₹ १४,४७,२८,५६३.०० |
| २. | रोहा शहरातील पावसाळी पाण्याचा निचरा क्षमता सुधारण्यासाठी मस्जिदजवळील बायपास रस्त्यावर जुन्या लहान बॉक्स कल्व्हर्टच्या जागी आरसीसी बॉक्स कल्व्हर्टचे बांधकाम करणे. | ₹ ३९,१७,५२३.०० |
| ३. | अलिबाग प्रदेश व नागोठणे औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पोयनाड व नागोठणे येथील महामंडळाच्या भांडारगृहात भारतीय मानांकन २६०/१९६९ नुसार ८% द्रव (लोहमुक्त) अॅल्युमिनियम सल्फेटचा पुरवठा करणे. | ₹ १,४७,५५,०००.०० |

उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०६/०६/२०२५ ते दिनांक ३०/०६/२०२५ पर्यंत, अ.क्र. २ व ३ वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०६/०६/२०२५ ते दिनांक २०/०६/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामांबाबत दिनांक ११/०६/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १३/०६/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### गाडीची काच फोडून चोरी

**पनवेल :** तालुक्यातील पळस्पे येथे उभ्या ठेवण्यात आलेल्या गाडीची दोघा अज्ञात चोरट्यांनी काच फोडून गाडीच्या आतमध्ये असलेली रोख रक्कम टॅब, लॅपटॉप असा महागडा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे. बाळासाहेब यांनी त्यांची गाडी पनवेल जवळील पळस्पे फाटा अरहित अस्पायर रेसिडेन्सीअल प्रोजेक्ट येथे उभी ठेवली असता अज्ञात दोन व्यक्तींनी मोटरसायकलवरून येवून त्यांच्या गाडीची काच फोडून लिओनो कंपनीचा लॅपटॉप, सॅमसंग ५ जी टॅबलेट व रोख रक्कम असा मिळून जवळपास ७४ हजारांचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### प्रकल्पग्रस्तांचे खासदार बारणेंना साकडे



**मोहोपाडा** : रसायनीतील खाने आंबिवली प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांची शिवसेना पनवेल कार्यालय येथे भेट घेऊन गावातील विविध समस्यांवर चर्चा करून निवेदन देण्यात आले. रसायनी परिसरातील खाने आंबिवली गावातील विकासासंबंधी प्रश्न, प्रकल्पग्रस्तांच्या जागेवर येणारे प्रकल्प, स्थानिकांना प्रथम प्राधान्य आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. आपल्या मागण्यांना माझा पुर्ण पाठिंबा असल्याचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी सांगितले. या वेळी मारुती खाने, दत्तात्रेय खाने, दीपक कांबळे, कृष्णा खाने, विनोद शिंदे, नरेंद्र गोपाळे व इतर नागरिक उपस्थित होते.

### भूषण बल्लाळ सेवानिवृत्त

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीतील (महापारेषण) मुख्य अभियंता (स्थापत्य) भूषण बल्लाळ त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय सेवेनंतर नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महापारेषणच्या सातही परिमंडलामध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बल्लाळ यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांना शुभेच्छा दिल्या.



# कामोठे वसाहतीमध्ये गुटखा हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये बंदी असलेला गुटखा पानमसाला बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखेने विविध ठिकाणी धाडसत्र केले. या कारवाईत १५ हजार ५५६ रूपये किंमतीचा प्रतिबंधित गुटखा, व पानमसाला जप्त केला आहे.

कामोठे वसाहतीमध्ये बऱ्याच टपर्यावर गुटखा विक्री कारवाई होणे अपेक्षित आहे. अरविंद श्रीकृष्ण साहू, महेशप्रसाद श्रीसिताराम महंतो, लक्ष्मण कारू प्रसाद असे ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. त्याचबरोबर कामोठे वसाहतीमध्ये गुटखा पुरवठा करणारा आरोपी ओमकार गुप्ताचा फरार झाला आहे. अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक



निगडे यांनी कर्तव्यावर असलेले पोलिस शिपाई ओंकार आंबवले, गोरे, तायडे, पवार, अहिरे, चालक पाटील यांनी कारवाई केली. येथील टपरीचालक अरविंद श्रीकृष्ण साहू याची झडती घेतली असता, त्याच्या पानटपरी मध्ये पानमसाला व तंबाखु पानमसाला गुटखा व तंबाखु आढळला. त्यानुसार दुसऱ्या टपरीवर धाड टाकताच तेथील टपरीचालक महेशप्रसाद श्रीसिताराम महंतो पानमसाला गुटखा व तंबाखु ताब्यात घेतले. त्याचबरोबर बाजुलाच असलेल्या पानटपरीजवळ पथकाने लक्ष्मण कारू प्रसाद व पिंटु श्रीरामु निशाद याच्या टपरीवर देखील प्रतिबंधित गुटखा आढळला.

कामोठे वसाहतीमध्ये शेकडो टपऱ्यावर गुटख्याचा पुरवठा ओमकार गुप्ता हा करीत असल्याचे समोर आले आहे, मात्र कामोठ्यात गुटखा विक्रीवर अंमली पदार्थ विरोधी कक्ष गुन्हे शाखेने कारवाई करताच गुप्ता फरार झाला आहे. पोलीस गुटखा पुरवठा करणारा गुप्ताला लवकरच ताब्यात घेतील आणि गुटखा माफियाला बेड्या ठोकतील.

# भटक्या कुत्र्याचा सुरक्षा रक्षकावर हल्ला



**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील स्पॅगेटी सोसायटीतील सुरक्षा रक्षकावर कुत्र्याने हल्ला केला. यात त्यांच्या चेहऱ्याला जखम झाली आहे. कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे रहिवाशांमध्ये भीती आहे. पालिकेने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे.

सकाळी नऊच्या सुमारास स्पॅगेटीतील पारिजात इमारतीत कर्तव्यावर असलेल्या नौशाद आलम या सुरक्षा रक्षकावर भटक्या कुत्र्याने हल्ला करून चेहरा, पायाला चावा घेतल्यामुळे रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

सोसायटीतील सफाई कामगार असलेल्या महिलेवर कुत्रा धावून गेला. या वेळी महिलेने आरडाओरड केल्याने सुरक्षा रक्षक नौशाद आलम मदतीसाठी गेला असता कुत्र्याने त्यांच्यावर हल्ला करीत चेहरा, पायाला चावा घेतला.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवशी जलसिंचन उपशास प्रारंभ

## गव्हाण विद्यालयाच्या विंधन विहिरीला मुबलक पाणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज साठी पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर होण्यासाठी विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते ठाकूर साहेब यांच्या अर्थसहाय्यातून खोदण्यात आलेल्या विंधन विहिरीला मुबलक आणि जीवंत पाणीसाठा लागला असून या विंधन विहिरीतून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून २ जून २०२५ रोजी जलसिंचन उपशास प्रारंभ करण्यात आला.

या शुभ मुहूर्तावर इंधन विहिरीतून सबमर्सिबल पंप द्वारे संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांच्या शुभहस्ते कळ दाबून जलसिंचनास प्रारंभ करण्यात आला.यावेळी शिक्षक सागर रंधवे, कोकण बोअरवेल्स चे प्रभाकर बुधाजी पाटील,सेवक जनार्दन खैरे व विद्यार्थी उपस्थित होते.सबमर्सिबल पंप मधून पाण्याचा प्रचंड स्त्रोत बाहेर पडताच सर्वांनी जल्लोष केला.कर्मवीर भाऊराव पाटील यांचेसह लोकनेते



माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांचाही जय जयकार करण्यात आला. लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांनी विंधन विहिरी खोदणे व उपसा सिंचन सुविधांसाठी सुमारे तीन लाख रुपयांचे अर्थसहाय्य केले आहे त्या बद्दल विद्यालयाचे वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

मे महिन्याच्या रखरखत्या उन्हात विंधन विहीरी खोदण्यात आल्या आणि दोन विंधन विहिरींना पाणी लागले असून या विंधन विहिरी खोदण्यासाठी राबविण्यात आलेल्या विशेष जल मोहिमेचा सातत्याने पाठपुरावा करणारे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी विद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य गोवर्धन गोडगे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व लाईफ मेंबर रवींद्र भोईर तसेच शिक्षक सागर रंधवे व राजेंद्र चौधरी, ग्रंथपाल महेश म्हात्रे, सेवक जनार्दन खैरे यांनी विशेष पाठपुरावा केला.

सिडकोच्या लहरीपणामुळे विद्यालयाला पाणीपुरवठ्याची सतत कमतरता भासत होती. त्यासाठी अनेकदा टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असे, मात्र यावर कायमस्वरूपी रामबाण उपाय काढण्याच्या आदेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिला. त्याप्रमाणे विद्यालयाने अहिल्यानगर जिल्ह्यातून प्रगतशील शेतकरी व अनुभवी भूजल तज्ज्ञ विष्णू हराळ यांना ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी व सागर रंधवे यांचेमार्फत पाचारण करण्यात आले.

ठाकूर इंफ्राप्रोजेक्टस प्राइवेट लिमिटीडचे अभियंता शिवाजी अहिरकर यांच्या योजनेप्रमाणे मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर यांचेही विशेष सहकार्य लाभले. विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे यांचेसह सेवक जनार्दन खैरे, धनाजी ठाकूर, दयानंद खारकर, अरूण कोळी, वरिष्ठ लेखनिक निलेश गोडे यांनीही परिश्रम घेतले. विद्यालयाला कायमस्वरूपी व जीवंत गोड पाण्याचा जलसाठा उपलब्ध झाल्याबद्दल, माननीय लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अर्थसाहाय्यातून विद्यालयास हा जलसाठा उपलब्ध झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, माजी उपसरपंच विजय घरत, तत्कालीन प्राचार्य गोवर्धन गोडगे, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेजच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर आदींचेही विद्यालयाच्या वतीने नूतन प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख बाबुलाल पाटोळे, एम.एन.एम.विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवळकर आदींच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करून अभिनंदन करण्यात आले. दोन्ही विद्यालयाची जलसमस्या दूर झाल्याबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येवून अभिनंदन करण्यात येत आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा नुकताच वाढदिवस झाला. यानिमित्त सिद्धकला प्रिंट मिडिया पब्लिकेशन प्रा. लि.चे संस्थापक तुषार खानविलकर आणि त्यांच्या कन्या संचालक तेजल आणि कृतिका खानविलकर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी दै. रामप्रहरचे मुख्य संपादक देवदास मटाले, व्यवस्थापक दादाराम मिसाळ उपस्थित होते.**

### भूमिगत वीजवाहिनीचा स्फोट; वाशीत घटना

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठीचे गटाराच्या बांधकामासाठी जमिनीत ड्रिल करताना भूमिगत वीजवाहिनीचा स्फोट झाल्याची घटना वाशी सेक्टर २८ परिसरात घडली. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली.

यामुळे परिसरातील काही घरांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. वीजवाहिनीचा स्फोट झाल्यानंतर त्याच्या आवाजाने स्थानिकांत भीती पसरली होती.

# वाशीत शिव राज्याभिषेक सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

विष्णूदास भावे नाट्यगृह वाशी येथे ६ जून २०२५ रोजी दुपारी बारा वाजता शिवराज्याभिषेक सोहळा होत आहे.

या वेळी शिवरायांच्या जीवनातील अनोखे धागेदोरे या विषयावर पानिपतकार विश्वास पाटील हे व्याख्यान देणार असून, चला आपणही आपापल्या क्षेत्रातील छत्रपती बनूया ते महाराज शिव छत्रपती यांच्या जीवनातील धागेदोरे आणि संदर्भासह व्याख्यान करणार आहेत. पद्मश्री अच्युत पालव, अर्जुन पुरस्कार प्राप्त अभिलाषा म्हात्रे, कला महर्षी अशोक हांडे, उद्योजक प्रकाश बाविस्कर यांना वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येईल, असे शिव तुतारी प्रतिष्ठान चे अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी सांगितले.

शाहीर रुपचंद चव्हाण यांचा, शाहिरी बाणा महाराष्ट्राचा! हा देखील कार्यक्रम असेल, सोबतच दहावी,बारावी परीक्षेत नवी मुंबई मधून त्या–त्या शाळा महाविद्यालयातून प्रथम आणि द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात येणार आहेत. या वैचारिक शिव राज्याभिषेक सोहळ्यास मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे कळविण्यात आले आहे.

# वृक्षारोपण मोहीमेत सहभागी होण्याचे नवी मुंबईकरांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने वृक्षारोपण मोहीम राबविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. ५ जून २०२५ रोजी 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन या संकल्पनेंतर्गत पर्यावरण दिन साजरा होत असताना, महानगरपालिकेने पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, आगामी पावसाळ्यात उद्यान विभागाच्या माध्यमातून व्यापक वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत सुरंगी, मलबेरी, जाम, कदंब, काजू, बांबू, करंज, आवळा, तुती, शिरीष, सुपारी, अशोक, कडूनिंब, चिकू, पेरू, सीताफळ आणि बदाम यासारख्या विविध देशी वृक्षांची आणि फळझाडांची लागवड जैवविविधता वाढीच्या दृष्टीने करण्याचे नियोजन आहे.

या अंतर्गत संपूर्ण महानगरपालिका कार्यक्षेत्रात ६० हजारांपेक्षा अधिक वृक्षांची लागवड केली जाणार आहे. या उपक्रमामुळे शहराच्या हिरवाईत वाढ होणार असून पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल. तसेच प्लास्टिक प्रदूषण कमी करण्याच्या जागतिक



प्रयत्नांकरिता नवी मुंबई महानगरपालिकेचे हे योगदान निश्चितच प्रेरणादायी ठरेल. नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांनाही या वृक्षारोपण मोहीमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जेणेकरून या महत्त्वपूर्ण उपक्रमाला लोकसहभागातून अधिक बळ मिळेल.

वृक्षारोपण ही केवळ पर्यावरणाची काळजी घेण्याची बाब नाही, तर आपल्या भावी पिढ्यांसाठी एक सुरक्षित आणि सुंदर भविष्य निर्माण करण्याची जबाबदारी आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या या वृक्षारोपण मोहीमेमुळे शहराच्या पर्यावरणात सकारात्मक बदल घडून येईल आणि प्लास्टिक प्रदूषणाच्या विरोधात एक व्यापक संदेश प्रसारित होईल. त्यामुळे उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# अंजुमन–ए–इस्लामतर्फे करिअर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन–ए–इस्लाम संस्थेच्या अध्यक्ष पद्मश्री डॉ. झहीर आय काझी यांच्या नेतृत्वाखाली न्यू पनवेल येथील कालसेकर टेक्निकल कॅंपस इथे स्टार फेलिसिटेशन आणि करिअर गाईडन्स प्रोग्रॅम–२०२५ यशस्वीरीत्या झाला. या कार्यक्रमात १०००हून अधिक विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम आणि शासकीय शिष्यवृत्ती योजनांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. अबुसुफियान शेख यांच्या पवित्र कुरआन पठणाने झाली. त्यानंतर कॅंपस डायरेक्टर डॉ. रमजान खाटिक यांनी महाविद्यालयाची ओळख आणि स्वागतपर भाषण केले. करिअर मार्गदर्शन सत्रात डॉ. रोहन दासगुप्ता (AIKTC), तसेच CSMT आणि एम.एच. सबू सिद्दीकी कॅंपसचे प्रतिनिधी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांची माहिती दिली. प्रमुख पाहुणे डॉ.मुनीर सय्यद (सहाय्यक उपाध्यक्ष, जिओ) यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी भाषण दिले. तरसंस्थेचे चेअरमन बुरहान हॅरिस यांनी विद्यार्थ्यांना विविध करिअर



स्टॉल्सला भेट देण्याचे आवाहन केले. अइनुल अतार (डायरेक्टर, तांत्रिक शिक्षण, अंजुमन–ए–इस्लाम) यांनी विविध सरकारी शिष्यवृत्ती योजनांची माहिती दिली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांमध्ये शोएब इशाक जिमखानावाला (संयुक्त सचिव, अंजुमन–ए–इस्लाम), बुरहान हॅरिस (संस्थेचे चेअरमन), शौकत अली बेटीगिरी (कार्यकारी अध्यक्ष, पंचगणी कॅंपस), इक्बाल कवारे (सदस्य, बीआयएनएम), मुनीर सय्यद (सहाय्यक उपाध्यक्ष, जिओ), शगफ नाकीद (उएज, अंजुमन–ए–इस्लाम), आणि माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू गुलाम पारकर यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या शेवटी SSC आणि HSC मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा, त्यांच्या पालकांचा गुण गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम अंजुमन–ए–इस्लामतर्फे मुंबई व नवी मुंबईतील ७ ठिकाणी घेण्यात आलेल्या मेगा करिअर मार्गदर्शन उपक्रमाचा भाग होता, ज्यातून संस्थेची विद्यार्थ्यांच्या यशाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीत मोठा वाटा बुरहान हॅरिस (संस्थेचे चेअरमन), डॉ. रमजान खाटिक (कॅंपस डायरेक्टर), डॉ. शारिक सय्यद (प्राचार्य, फार्मसी), डॉ. राजेंद्र मागर (प्राचार्य, अभियांत्रिकी), प्रा. राज म्हात्रे (प्राचार्य, आर्किटेक्चर), प्रा.आरिफ शेख (प्राचार्य, AIARKP) तसेच सर्व विभागप्रमुख, समन्वयक आणि नियोजन समितीचा होता. कार्यक्रमाचे नेतृत्व प्रो. मोईन बोरोटिकार आणि फरहान मूसा यांनी केले. हा कार्यक्रम अंजुमन–ए–इस्लाम संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

# अनेक प्रकल्पांमुळे तळोजा नोडचे महत्त्व अधोरेखित

**नवी मुंबई : बातमीदार**

तळोजा (खारघर पूर्व) हा दक्षिण नवी मुंबईतील वेगाने विकसित होणारा नोड असून, पायाभूत सुविधा आणि विकास यामुळे त्याचे भरभराटीच्या केंद्रात रूपांतरण होत आहे. खारघर, पनवेल, कल्याण आणि डोंबिवली जवळ मोक्याच्या ठिकाणी स्थित असलेला तळोजा नोड आधुनिक सुविधा, कनेक्टिव्हिटी आणि परवडणाऱ्या किमतीचे एक अद्वितीय मिश्रण देतो, ज्यामुळे रहिवासी आणि व्यवसायांसाठी हे एक आकर्षक ठिकाण बनले आहे. सिडकोने विकसित करत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यामुळे तळोजा नोडचे महत्त्व अधिकच अधोरेखित होत आहे.

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) तळोजाच्या रस्ते, पूल, सार्वजनिक सुविधा आणि नवी मुंबई मेट्रोसह पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. या विकासामुळे नोडची मागणी अजूनच वाढेल व ते राहण्यासाठी आणि गुंतवणूकीसाठी एक लोकप्रिय ठिकाण बनणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील तळोजा नोडचे धोरणात्मक स्थान त्याच्या विकासात क्रांती घडवून आणण्यास सज्ज आहे. त्याचबरोबर रहिवासी आणि व्यवसायांसाठी अतुलनीय कनेक्टिव्हिटी आणि विकासाच्या संधी प्रदान करत आहे. तळोजा ते सीबीडी बेलापूर यांना अखंडपणे जोडणारी नवी मुंबई मेट्रो लाईन १ एक जीवनरेखा म्हणून प्रस्थापित झाली आहे. शिवाय, पूर्णत्वास साकारणारा खारघर–तळोजा पूल प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करेल व एकंदरीतच राहणीमानाचा दर्जादेखील वाढवेल, असे सिडकोचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले.

या नोडचा सातत्याने विकास होत राहिल्याने, ते रहिवासी व व्यवसाय यांना उत्कृष्ट संधी प्रदान करून विविध प्रकारच्या गुंतवणूकदारांना आकर्षित करेल अशी अपेक्षा आहे.

# नेट प्रोब्लेम, दाखल्यांसाठी सेतू केंद्रावर गर्दी



**चौक : प्रतिनिधी**

शासकीय लाभासाठी लागणाऱ्या विविध दाखल्यांसाठी सद्या खालापूर सेतू केंद्रावर लाईन लागत असून सेतू केंद्रातील कर्मचारी यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून, अनेक विद्यार्थी यांना वेगवेगळ्या प्रकारचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, रहिवाशी दाखला, क्रिमिलेअर दाखला, जातीचे दाखले, इडब्ल्यूएस दाखला, जेष्ठ नागरिक दाखला, जन्माचे दाखले, मृत्यू प्रमाणपत्र साठी प्रतिज्ञा पत्र, वैद्यकीय दाखला असे अनेक प्रकारचे दाखले, कागदपत्रे घेण्यासाठी सेतू केंद्रावर अर्ज सादर करावे लागतात.

खालापूर तहसील कार्यालयाच्या माध्यमातून सेतू केंद्रावर हे दाखले मिळतात, परंतु सध्या नेट प्रोब्लेम सुरू असून, कधी साईट जॅम होते, तर कधी साईट स्लो असल्याने दाखले मिळण्यास उशीर होत आहे, त्याचा आर्थिक, वेळेचा फटका विद्यार्थी, त्यांचे पालक यांना बसत असून त्याचा परिणाम सेतू केंद्रावर लाईन लागण्यास होत आहे.

त्यातच अवकाळी वादळाने, अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने येथील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे आणि विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी बंद होणारा वीज पुरवठा हे महत्वाचे कारण आहे. तहसीलदार अभय चव्हाण, त्यांचे अधिकारी, कार्यालय कर्मचारी आणि सेतू कार्यालयातील कर्मचारी हे दाखले देण्यासाठी प्रयत्न करीत असताना नेट प्रोब्लेम सुरू आहे.

# अलिबाग वनविभागात समुपदेशनाने बदल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड महसूल विभागाप्रमाणे अलिबाग वन विभागातील कर्मचारयांच्या बदल्यादेखील समुपदेशन पदधतीने करण्यात आल्या. अलिबाग वन विभागातील वनरक्षक आणि वनपाल अशा ५४ कर्मचारयांना त्यांच्या पसंतीनुसार बदलीचे ठिकाण देण्यात आले. वनविभागात पहिल्यांदाच हा उपक्रम राबवण्यात आला आहे. उपवनसंरक्षक राहुल पाटील यांच्या भूमिकेमुळे वनकर्मचारी सुखावले आहेत.

वन विभागात पहिल्यांदाच हा प्रयोग करण्यात आला आहे. कुठल्याही राजकीय हस्तक्षेपाविना ही बदली प्रक्रिया अतिशय पारदर्शक झाली असून कर्मचारी समाधानी असल्याचा दावा उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी केला आहे. राज्य सरकारचा बदल्या आणि कामकाजातील पारदर्शकतेच्या कायद्यान्वये शासनाने दिलेले मार्गदर्शन आणि निर्गमित केलेल्या सूचनांनुसार या बदल्या करण्यात आल्या. अलिबाग वन विभागातील वनरक्षक आणि वनपाल मिळून ५४ जण बदलीसाठी पात्र होते. या बदलीपात्र कर्मचारयांना बदलीसाठी नियुक्त समितीच्या समोर उभे करून समुपदेशनाने बदलीसाठी उपलब्ध रिक्त जागा दाखवून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. ज्येष्ठतेनुसार प्राधान्यक्रमाने संधी देण्यात आली. बदली करताना कर्मचारयांचे जास्तीतजास्त समाधान करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ज्या कर्मचारयांच्या बदल्या झाल्या त्यांना तत्काळ बदलीचे आदेशही देण्यात आले.

**अत्यंत पारदर्शकपणे, कुणाच्याही शिफारशी विना, दबावाशिवाय ही बदली प्रक्रिया पार पडली आहे. महत्वाचे म्हणजे कर्मचारयांना समोर बोलावून त्यांना बदलीसाठी रिक्त ठिकाणे दाखवून प्राधान्य क्रमाने या बदल्या करण्यात आल्या. कुणावरही अन्याय होणार नाही, नैसर्गिक न्याय मिळेल याची काळजी घेण्यात आली त्यामुळे कर्मचारी समाधानी आहेत.**

**–राहुल पाटील**, उपवनसंरक्षक अलिबाग

**वनविभागात पहिल्यांदाच अशा प्रकारची बदली प्रक्रिया राबवण्यात आली आहे. आपल्या पसंतीचे बदलीचे ठिकाणी मिळाल्याने कर्मचारीदेखील समाधानी आहेत. महत्वाचे म्हणजे कुठलाही वशिला न वापरता अत्यंत पारदर्शकपणे ही प्रक्रिया पूर्ण झाली. उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी जास्तीत जास्त कर्मचारयांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला ही बदली प्रक्रिया राहुल पाटील बदली पॅटर्न नावाने राज्यात राबवण्याची गरज आहे.**

**–एम.डी.तायडे**, अध्यक्ष महाराष्ट्र वनपाल, वनरक्षक संघटना अलिबाग शाखा

## रेवदंडा येथे सत्यसाई रथयात्रा

**रेवदंडा:** सत्यसाईबाबांच्या कार्याची ओळख इतरांना व्हावी आणि त्यांचे शुभाशिर्वाद सर्वांना मिळावेत म्हणून त्यांच्या ह्या जन्मशताब्दी वर्षात भारतभर चाररथ रवाना झाले आहेत ज्यात त्यांच्या पादुकांच्या दर्शनाचा आपण लाभ घेऊ शकतो. रेवदंडा येथे ही रथयात्रा येत्या शनिवारी ७ जून रोजी साधारण ४ वाजता पोहोचेल २ दिवस मुक्काम असेल.

## स्व. गोपीनाथ मुंडे यांना खोपोलीकरांचे अभिवादन




**खालापूर : प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते लोकहितवादी संघर्षयोधा, असंख्य कार्यकर्त्यांचे प्रेरणास्रोत स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या अकराव्या स्मृतिदिना निमित्त भारतीय जनता पार्टी खोपोली शहर मंडलाच्या वतीने भाजप मध्यवर्ती कार्यालय येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी भाजप शहर अध्यक्ष राहुल जाधव, दिलीप पवार, विकास नाईक, डॉ. बबन नागरगोजे, अनिल कर्णुक, संजय म्हात्रे, सुनील नांदे, गणेश ठाकरे, हेमंत भाटिया, अपर्णा साठे, सुप्रिया नांदे, सुमिता महर्षी, प्रमोद वाघ, रवी राणावत ऋषिकेश म्हात्रे आदी भाजप पदाधिकार व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महेंद्र थोरवे फाउंडेशनच्या वतीने मोफत दाखले वाटप



**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि तहसीलदार कार्यालय कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत शासकीय दाखल्यांचे वाटप शिबीर संपन्न झाले. यावेळी तालुक्यातील दुर्गम भागासह अन्य भागातील लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.,

रॉयल गार्डनच्या सभागृहात दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी नायब तहसीलदार सचिन राऊत, गोविंद कौटुंबे, आशा म्हात्रे, प्रसाद थोरवे, मंडल अधिकारी संतोष जांभळे, वैशाली पाटील, शीतल मोरे, पार्वती वाघ, सुनील रसाळ, अभिषेक सुर्वे, दिनेश कडू, अरुण देशमुख, डॉ. राजू थोरवे, विलास श्रीखंडे आदी उपस्थित होते. सुनिल रसाळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी तात्काळ काढलेल्या जातीच्या दाखल्यांचे वाटप तहसीलदार डॉ. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. आधार कार्ड दुरुस्ती, रेशनिंग कार्ड, उत्पन्न दाखले, डोमासाईल, जातीचे दाखले, संजय गांधी निराधार योजना अंतर्गत अर्थसहाय्य, ॲग्रीस्टॅक अंतर्गत किसान कार्ड, निवडणूक ओळखपत्र इत्यादी दाखल्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

याप्रसंगी तहसीलदार डॉ. जाधव यांनी, 'अशा प्रकारच्या शिबिरांमुळे सर्व सामान्य जनतेला हवे असलेले दाखले मिळतात. कागदपत्रांची योग्य पूर्तता केल्यास लगेचच दाखले मिळू शकतात. अन्यथा कागदपत्रांची तपासणी करून हे दाखले तहसील कार्यालयात उपलब्ध होतील.' असे स्पष्ट केले.

याप्रसंगी माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे, नदीम खान, ज्ञानेश्वर करणूक, योगेश थोरवे, वनिता म्हसे, कमल विशे, प्रदीप वायकर, भरत भासे आदींसह उपस्थित होते.

**नमुना – १**

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस**

**उपविभागीय अधिकारी महाड यांचे**
**कार्यालय ता. महाड, जि. रायगड**
**दिनांक. ११/०४/२०२५**

**क्रमांक :– भूसंपादन/कात–५/ पाचाड थेजख/४९७०९२१/नोटीस / २०२५**

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, विशेष पथक रायगड किल्ला (मार्ग प्रकल्प विभाग) महाड यांनी मौजे पाचाड, ता. महाड जि. रायगड येथील जमीन हेलीपॅडकरिता भूसंपादन प्रस्तावकरिता खाजगी क्षेत्रातील खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने महसूल विभागातर्फे संपादन करणे संबंधी कार्यकारी अभियंता विशेष पथक रायगड किल्ला (मार्ग प्रकल्प विभाग) महाड त्यांचेकडील पत्र नं. जा.क्र. माप्रवि/विपराकि/प्रशा/६१ दिनांक २२/०२/२०२४ अन्वये उपविभागीय अधिकारी महाड यांचेकडे सादर केला आहे. सदरचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र./भूसंपादन/कात ५/पाचाड/२०२४ दिनांक १३/०३/२०२४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेश क्रमांक भूसंपादन / टे–६/१७५५३५१/मौजे पाचाड/२०२४ दिनांक १९/०४/२०२४ अन्वये उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन ०१/२०१७/ प्र.क्र. १२/अ–२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, **मी उपविभागीय अधिकारी महाड** याद्वारे,

१. अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता विशेष पथक रायगड किल्ला (मार्ग प्रकल्प विभाग) महाड यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

२. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे कार्यकारी अभियंता विशेष पथक रायगड किल्ला मार्ग प्रकल्प विभाग महाड यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

४. संबंधित भूधारकांची ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता विशेष पथक रायगड किल्ला (मार्ग प्रकल्प विभाग) महाड यांचेकडे दाखल करावीत.

५. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता विशेष पथक रायगड किल्ला मार्ग प्रकल्प विभाग महाड यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच सदर नमुना महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

६. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी महाड व कार्यकारी अभियंता विशेष पथक रायगड किल्ला (मार्ग प्रकल्प विभाग) महाड यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची – १**

**मौजे पाचाड, ता. महाड, जि. रायगड**

| अनु. | गट नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ३१ | ४१.०० | ०.०६ |
| २ | ३२ | १९.०० | ०.०३ |
| ३ | ३३ | ५.३० | ०.०३ |
| ४ | ३४अ | ११.०० | ०.०२ |
| ५ | ३४ब | १२.०० | ०.०२ |
| ६ | ३५ | २.०० | ०.०२ |
| ७ | ३६ | १५.४० | ०.१२ |
| ८ | ३७ | ८.३० | ०.०६ |
| ९ | ३८ | १९.५० | ०.५५ |
| १० | ५२ | ७.१० | ०.३ |
| ११ | ५३ | ६.८० | ०.०५ |
| १२ | ५४ | ४९.४० | ०.३६ |
| १३ | ५५ | ६.८० | ०.२७ |
| १४ | ५७ | २२.३० | ०.९२ |
| १५ | ५८ | ३४.७० | ०.५९ |
| १६ | ५९ | १०.०० | ०.०२ |
| १७ | ६० | १७.१० | ०.१२ |
| १८ | ६१ | २६.७० | ०.१९ |
| १९ | ६२ | ३६.०० | ०.०६ |
| २० | ६३ | १३.०० | ०.०२ |
| २१ | ६४ | १०.७० | ०.३१ |
| २२ | ६५ | १८.१० | ०.०३ |
| २३ | ६६ | १.३० | ०..०६ |
| २४ | ६७ | १२.१० | ०.४४ |
| २५ | ६८ | १७.३० | ०.४८ |
| २६ | ६९ | ४.५० | ०.०२ |
| **एकूण** | | **४२७.४०** | |

**ठिकाण** : महाड
**दिनांक ११/०४/२०२५**

**उपविभागीय अधिकारी महाड**

**क्र. जिमाका/राअ/जाहि/८०/२०२५–२६**



# ‘आरसीबी’ची स्वप्नपूर्ती!

## आयपीएल चषकाला १७ वर्षांनी गवसणी

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५च्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पंजाब किंग्ज संघाचा सहा धावांनी पराभव केला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने १९० धावा केल्या. प्रत्युत्तरात पंजाब संघाला १८४ धावा करता आल्या. यासह आरसीबीची १८ वर्षांची प्रतीक्षा संपली आहे.

पंजाबच्या संघाने दमदार सुरुवात केली होती. प्रभसिमन सिंगला तर जीवदानही मिळाले होते. तो आणि प्रियांश आर्या चांगली फलंदाजी करत होते. प्रियांश २४ धावांवर बाद झाला, तर प्रभसिमरनने २६ धावा केल्या. हे दोघे दमदार सुरुवात करून बाद झाले. पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यर या सामन्यात एका धावेवर बाद झाला. निर्णायक वेळी भुवनेश्वर कुमारने



एकाच षटकात सामन्याचा मार्ग बदलला. त्याने नेहल वधेराला १५ धावांवर बाद केले. त्यानंतर मार्कस स्टोइनिसलाही लवकरच पॅव्हेलियनमध्ये पाठवण्यात आले. स्टोइनिसने येताच षटकार मारला, परंतु पुढच्याच चेंडूवर तो बाद झाला. त्याने फक्त २ चेंडूत फक्त ६ धावा काढल्या. कृणाल पंड्याने गोलंदाजीत चांगली कामगिरी केली आणि चार षटकांत दोन बळी घेतले.

पंजाबकडून शशांक सिंगने ३० चेंडूत सर्वाधिक ६१ धावा केल्या, ज्यात तीन चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. तत्पूर्वी आरसीबी संघाने प्रथम फलंदाजी करताना १९० धावा केल्या. विराट कोहलीने संघासाठी सर्वाधिक ४३ धावा केल्या. त्याच्याशिवाय कर्णधार रजत पाटीदारने २६ धावा आणि जितेश शर्माने २४ धावा केल्या. या खेळाडूंमुळेच संघ मोठा धावसंख्या उभारू शकला. आयपीएल ट्रॉफी जिंकल्यानंतर आरसीबीला बक्षीस म्हणून २० कोटी रुपये मिळाले.

आरसीबी संघाने या सामन्यात केवळ फलंदाजीतच नव्हे, तर गोलंदाजीतही चमकदार कामगिरी केली. दुसरीकडे जर आपण पंजाब किंग्ज संघाबद्दल बोललो, तर ते हा सामना जिंकू शकले नसले तरी त्यांना उपविजेते म्हणून १३ कोटी रुपये मिळाले.

## आयपीएल संपताच टी २० मुंबई लीग सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीग २०२५ संपली आहे. आयपीएल संपल्यानंतरही चाहत्यांचं मनोरंजन होत राहील. कारण आज म्हणजेच ४ जूनपासून टी-२० मुंबई लीग सुरू होणार आहे. विशेष म्हणजे ही लीग ६ वर्षांनी पुन्हा सुरु होत आहे. ही लीग मुंबईच्या तरुण क्रिकेटपटूंसाठी त्यांची प्रतिभा दाखविण्याची सुवर्णसंधी आहे. या लीगचा लिलाव गेल्या महिन्यात ७ मे रोजी झाला. या लीगमध्ये एकूण ८ संघ सहभागी होणार आहेत. या लीगचा तिसरा हंगाम ४ जून ते १२ जून दरम्यान मुंबईतील वानखेडे आणि डी वाय पाटील स्टेडियमवर खेळवला जाईल.

या लीगमध्ये दररोज ४ सामने खेळवले जातील. या लीगचे दोन सामने वानखेडे स्टेडियमवर आणि दोन सामने डीवाय पाटील स्टेडियमवर खेळवले जातील. वानखेडे इथं होणाऱ्या सामन्यांमध्ये पहिला सामना दुपारी २:३० वाजता सुरु होईल आणि दुसरा सामना संध्याकाळी ७:३० वाजता खेळवला जाईल. तर डीवाय पाटील स्टेडियमवरील पहिला सामना सकाळी १०:३० वाजता सुरु होईल आणि दुसरा सामना संध्याकाळी ५:३० वाजता खेळला जाईल.

टी-२० मुंबई लीगच्या अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस निश्चित करण्यात आला आहे. म्हणजेच, जर कोणत्याही कारणास्तव १२ जून रोजी अंतिम सामना होऊ शकला नाही. तर अंतिम सामना १३ जून रोजी राखीव दिवस म्हणून खेळवला जाईल. तर उपांत्य फेरीच्या सामन्यांसाठी कोणताही राखीव दिवस ठेवण्यात आलेला नाही.










## आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत परी महाडीक, प्रभात पोकळे यांना सुवर्णपदक

### रोह्याच्या स्पर्धकांची नेत्रदीपक कामगिरी



**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

नेपाळ येथे झालेल्या आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत भारताच्या वतीने खेळताना रोह्याच्या परी महाडिक व प्रभात पोकळे यांनी सुवर्ण पदक पटकावले.

नेपाळ काठमांडू येथे ३० व ३१ मे रोजी झालेल्या आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत रोह्याच्या स्पर्धकांनी भारताचे नेतृत्व करून पदकांची लयलूट केली. इतर विजेत्यांमध्ये नेहा पवार (रौप्य पदक), अंतरा घाडगे (रौप्य पदक), सार्थक मोरे (रौप्य पदक), आर्यन धाटवकर (रौप्य पदक), सिद्धार्थ पैर (रौप्य पदक), उत्कर्ष घाणेकर (रौप्य पदक) यांनी विशेष कौशल्य दाखविले. या सर्व विजयी स्पर्धकांना इंग्लंड येथे होणाऱ्या विश्व मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये थेट प्रवेश मिळाला आहे.

भारतीय पंच विनायक सकपाळ यांची इंग्लंड येथे होणाऱ्या मिक्स बॉक्सिंग स्पर्धेसाठी मुख्य पंच म्हणून निवड झाली आहे. परी महाडीक व प्रभात पोकळे यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.






## वैभव सूर्यवंशीला मिळाली कार

**मुंबई :** राजस्थान रॉयल्सचा यंदाच्या आयपीएलमध्ये दर तीन चेंडूमागे एक सिक्सर मारणारा धडाडीचा फलंदाज वैभव सूर्यवंशीला 'सुपर स्ट्रायकर ऑफ द सीजन' पुरस्कार



मिळाला आहे. यामुळे त्याला टाटाची कर्व्ह ही कार बक्षीस मिळाली आहे. ही कार जरी वैभवला मिळाली असली तरी तो ती पुढील काही वर्षे चालवू शकणार नाहीय.

यंदाची आयपीएल वैभवने गाजवली. गुजरात टायटन्सविरुद्ध ३८ चेंडूत १०१ धावांची खेळी करत त्याने आयपीएलमधील सर्वात जलद शतक नोंदविले. तसेच तो आयपीएलमध्ये शतक ठोकणारा सर्वात तरुणही खेळाडू ठरला आहे.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com